https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे अंक -१४ | शनिवार,दि.२० सप्टेंबर २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-14 | Saturday, Dt.20 September 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# गोपीचंद पडळकरांच्या विधानाचे समर्थन करणार नाही

## आक्रमकपणा दाखवताना भान राखण्याची गरज -वाचा कोण काय म्हणाले ?

प्रतिनिधी । मुंबई

**भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे माजी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्याविषयी केलेल्या एका वादग्रस्त विधानाचे राज्यभरात तीव्र पडसाद उमटत आहेत. अनेक राजकीय नेत्यांनी या प्रकरणी पडळकरांच्या विधानाचा निषेध केला आहे. स्वत: शरद पवारांनी याविषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना फोन करून आपली नाराजी कळवली. त्यानंतर फडणवीसांनी पडळकरांना फैलावर घेत बोलताना भान राखण्याचा सल्ला दिला. गोपीचंद पडळकर यांनी केलेल्या विधानाचे आम्ही केव्हाच समर्थन करणार नाहीत, असे ते म्हणालेत.**

गोपीचंद पडळकर यांनी सांगलीत एकेठिकाणी बोलताना जयंत पाटील व त्यांच्या कुटुंबीयांविषयी वादग्रस्त विधान केले होते. यासंबंधीचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला



आहे. पत्रकारांनी शुक्रवारी याविषयी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना प्रश्न केला. त्यावर ते म्हणाले, गोपीचंद पडळकर यांनी जे स्टेटमेंट केले ते योग्य आहे

असे माझे मत नाही. कुणाच्याही वडिलांविषयी किंवा परिवाराविषयी असे बोलणे योग्य नाही. यासंदर्भात माझी पडळकरांशी चर्चा झाली. त्यांनाही मी सांगितले. मला शरद पवारांचाही फोन आला होता. त्यांच्याशीही मी संवाद साधला. अशा प्रकारच्या विधानाचे आम्ही कधीच समर्थन करणार नाही.

### बोलताना भान राखण्याचा सल्ला

गोपीचंद पडळकर एक तरुण नेते आहेत. आक्रमक नेते आहेत. अनेकदा आक्रमकपणा दाखवत असताना आपल्या बोलण्याचा नेमका काय अर्थ निघेल हे ते लक्षात घेत नाहीत. त्यामुळे मी त्यांना सांगितले आहे की, हे लक्षात घेऊनच आपला आक्रमकपणा राखला पाहिजे. तुम्हाला भविष्यात चांगला नेता म्हणून मोठी संधी आहे. त्यामुळे आपण बोलत असताना त्याचे काय अर्थ निघतील हे लक्षात घेऊन आपण बोलले पाहिजे, असा सल्ला मी त्यांना दिला आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले. पत्रकारांनी यावेळी मुख्यमंत्र्यांना सरकार तयार करत असलेल्या गोल्डन डेटाविषयी प्रश्न केला. त्यावर ते म्हणाले, गोल्डन डेटावर अजूनही काम सुरू आहे. ते काम पूर्ण झाल्याशिवाय मी त्यावर बोलणार नाही.

# चौथी व सातवी इयत्तेसाठी शिष्यवृत्ती परीक्षा पुन्हा होणार

## पुढील शैक्षणिक वर्षापासून अंमलबजावणी शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांची माहिती

प्रतिनिधी । पुणे

राज्यातील गुणवत्तापूर्ण व नाविन्यपूर्ण शिक्षण उपक्रमांना चालना देण्यासाठी सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या जिल्हा परिषद व महानगरपालिकांना अनुक्रमे प्रथम क्रमांकास ५ कोटी, द्वितीय क्रमांकास ३ कोटी आणि तृतीय क्रमांकास २ कोटी रुपयांची प्रोत्साहनपर पारितोषिके देण्यात येतील, अशी घोषणा शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी केली आहे. पुढील शैक्षणिक वर्षापासून चौथी व सातवी इयत्तेसाठी शिष्यवृत्ती परीक्षा पुन्हा होणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

बालेवाडी येथे आयोजित दोन दिवसीय राज्यस्तरीय शालेय शिक्षण परिषदेचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. शालेय विभागाचे प्रधान सचिव रनजीत सिंह देओल, शिक्षण विभागाचे आयुक्त सचिन्द्र प्रताप सिंह, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,राज्य प्रकल्प संचालक संजय यादव, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेचे संचालक राहुल



रेखावार,राज्य परीक्षा परिषदेचे संचालक नंदकुमार बेडसे, शिक्षण विभागातील अधिकारी उपस्थित होते. प्रास्ताविक शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह यांनी केले. उद्घाटन सोहळ्यात शालेय शिक्षण मंत्री भुसे यांच्या हस्ते शिक्षक व अधिकारी-कर्मचारी स्पर्धा मार्गदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. सूत्रसंचालन संशोधन विभाग प्रमुख डॉ. दत्ता थिटे यांनी तर आभार विभागीय उपसंचालक डॉ. गणपत मोरे यांनी मानले.

महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर यावा

शिक्षण हे आनंददायी, गुणवत्तापूर्ण, भाकरीचे आणि राष्ट्रीयत्वाचे असले पाहिजे असे नमूद करून ते म्हणाले, महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर यावा यासाठी शिक्षण विभागाने नाविन्यपूर्ण उपक्रम राबवणे गरजेचे आहे.

शैक्षणिक सहलींचे महत्त्व

कृत्रिम बुद्धिमत्ता(एआय) व तंत्रज्ञानाचा वापर, पायाभूत सुविधा सुधारणा, प्रधानमंत्री पोषण शक्ती योजना, शिष्यवृत्ती परीक्षा व निपुण भारत अभियान यावर त्यांनी भर दिला. विद्यार्थ्यांच्या चौकसपणासाठी शैक्षणिक सहलींचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. पुढील शैक्षणिक वर्षापासून चौथी व सातवी इयत्तेसाठी शिष्यवृत्ती परीक्षा पुन्हा होणार असल्याची घोषणा त्यांनी केली.

# पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेबांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त कडा येथे आरोग्य शिबिर

## भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख

बीड /प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त दिनांक १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर मधे सुरू असणाऱ्या सेवा पंधरवडा व स्वस्थ नारी सशक्त परिवार मोहीमेअंतर्गत दिनांक २० सप्टेंबर शनिवारी प्राथमिक आरोग्य केंद्र कडा येथे आरोग्य शिबिराचे आयोजन केले आहे या महाआरोग्य शिबिराचा लाभ रुग्णांनी घ्यावा असे आवाहन भाजपाचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी केले आहे.



या आरोग्य शिबिरामध्ये स्पेशलिस्ट स्त्रीरोगतज्ञ , बालरोगतज्ञ, दंतरोगतज्ञ , नेत्ररोगतज्ञ यांच्या उपस्थितीमध्ये महिलांसाठी तसेच किशोरवयीन मुले, लहान बालके, गरोदर माता,वयोवृद्ध यांच्यासाठी आरोग्य शिबिर व नमो नेत्र संजीवनी या कार्यक्रम अंतर्गत डोळे तपासणी करून मोतीबिंदू तसेच डोळ्याचे इतर आजार चे निदान व उपचार साठी शिबीर आयोजित केले आहे. या आरोग्य शिबिरात सहभागी व्हावे सकाळी १० वा या शिबिराचा शुभारंभ होणार आहे या शिबिरा अंतर्गत नेत्र तपासणी नंतर ज्यांना चष्मा आवश्यक आहे अशा व्यक्तींना भारतीय जनता पार्टीचे वतीने घरपोच मोफत चष्मा वाटप होणार आहे.तरी सर्वांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी केले आहे.

# उपअभियंता जि.प.बां.वि.कार्यालयात भरदिवसा ढवळ्या आकडा टाकून विज चोरी

## सर्वांना समान मापदंड न दाखवता महावितरण या वीज चोरीसाठी उपअभियंता बांधकाम विभाग कार्यालयांवर मेहरबान का झाले...?

अंबाजोगाई / सुनिल सिरसाट

अंबाजोगाई शहरातील उप अभियंता जिल्हा परिषद बांधकाम विभाग कार्यालयात दिवसा ढवळ्या वीज वाहक तारांवर आकडा टाकून वीज चोरी करणाऱ्या शासकीय कार्यालयाचा सावळा प्रताप उजेडात आला असुन या विज चोरांवर महावितरण कोणती कारवाई करणार ? याकडे संपुर्ण सर्व सामान्य जनतेचे लक्ष लागले आहे.

सर्व सामान्य जनतेने वीज वाहक तारांवर आकडा टाकून वीज चोरी करत असल्याचे प्रकार असतांना अशी वीज चोरी पकडल्यानंतर शहरातील गोरगरीबांना मोठा आर्थिक दंड आणि कारवाई झाल्याचे वास्तव्य आहे.परंतु अंबाजोगाई शहरातील मध्य भागी असलेल्या उप अभियंता जिल्हा परिषद बांधकाम विभाग कार्यालयात गेल्या कित्येक वर्षांपासून आकडा टाकूनच चोरुनच वीज वापरली जात आहे.याविरुद्ध आश्चर्य व्यक्त केले आहेशासकीय कार्यालयात वीजेशिवाय कुठलेच काम चालत नाही,त्यामुळेच आधुनिक साधनासाठी महिन्याला शेकडो युनिटचा होणारा वापर हा कोणाच्या नावावर जातो असा प्रश्न उपस्थित होत असुन या गोंधळाबाबत महावितरण गप्प असल्याने सर्व सामान्य नागरिक संभ्रमात आहेत.

सर्वांना समान मापदंड न दाखवता महावितरण या वीज चोरीसाठी उप अभियंता बांधकाम विभाग कार्यालयांवर मेहरबान का झाली...?



गेल्या कित्येक वर्षांपासूनच राजरोसपणे वीजपुरवठा चोरी केल्याचे बील वसुल होणार का.....??

या शासकीय वीज चोरांवर महावितरण कार्यवाईचे धाडस दाखवणार का.? या बाबत वरिष्ठ अधिकारी दखल घेतील का..?

सर्व सामान्य नागरिकांकडून वीजवाहक तारांवर आकडा टाकून वीज चोरी केल्यास महावितरण कठोर बडगा उघडतो, मग शासकीय कार्यालयांनी हा प्रकार केल्यावर त्यांना अभय का मिळतो..? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

Regd.No.BIIR/BIIR/RSR/CR/142/2016

**रत्नसुंदर अर्बन को-ऑपरेटिव्ह क्रे. सोसायटी लि. माजलगाव**

कार्यालय :- गजानन मंदिर रोड, माजलगाव ता.माजलगाव, जि.बीड

**अधिमंडळ वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस**

(फक्त सभासदांसाठी) दिनांक :-११/०९/२०२५

रत्नसुंदर अर्बन को-ऑप. क्रेडिट सोसायटी लिमिटेड माजलगाव या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की आपल्या संस्थेची वार्षिक सर्व साधारण सभा सोमवार दिनांक २९/०९/२०२५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता चेअरमन मा.श्री. जयसिंह धैर्यशिल सोळंके यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे तरी सदर सभेत आपण उपस्थित राहावे ही विनंती.

**सभेपुढील विषय:-**

१) मागील नियामक सभेचा इतिवृत्त वाचण करणे.
२) सन २०२४-२५ अखेरचा कार्यकारी मंडळाने सादर केलेल्या वार्षिक हिशोब पत्रक, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक, तेरीज पत्रक, वाचन करणे व अहवाल मान्यता देणे.
३) सन २०२४-२५ अखेरचे ऑडीट रेपोर्ट व दोष दुरुस्ती अहवालची नोंद घेणे.
४) सन २०२४-२५ च्या नफा विभागीय मान्यता देणे.
५) सन २०२५-२६ च्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
६) सन २०२४-२५ मध्ये झालेल्या नविन सभासदांना मान्यता देणे.
७) ०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ च्या या आर्थिक वर्षात अंदाजपत्रकापेक्षा कमी जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे.
८) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी लेखा परीक्षकाची नेमणूक करणे बाबत. व त्याचे मानधन ठरविणे बाबत.
९) वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित नसलेल्या सभासदांची रजा मंजुर करणे बाबत.
१०) संस्थेच्या नित्रुड ता. माजलगाव येथील शाखेचे अंबाजोगाई ता. अंबाजोगाई येथे करणे बाबत.
११) संस्थेचे कार्यक्षेत्र हे राज्य विस्तारित करण्यास मान्यता देणे.
१२) संस्थेची इमारत बांधणीसाठी मंजुरी देणे बाबत.
१३) संस्थेच्या कार्यक्षेत्रात वाढ करणेसाठी खालील दिलेले आहेत
१) सिरसाळा ता.परळी जि.बीड
२) बीड ता.बीड जि.बीड
३) धारुर ता.धारुर जि.बीड
४) कडा ता.आष्टी, जि.बीड
५) टाकरवण ता.माजलगाव जि.बीड
१४) संस्थेच्या नवीन उपविधीस मान्यता देण्याबाबत.
१५)माननीय अध्यक्ष साहेब यांच्या अनुमतीने आहे. आयत्या वेळी येणाऱ्या विषयावर विचार विनिमय करणे.

स्थळ :- संस्थेचे मुख्य कार्यालय, माजलगाव जि.बीड
सभा दिनांक :- २९/०९/२०२५
मा. संचालक मंडळाच्या आदेशानुसार


स्वाक्षरीत/-
**अजित संभाजी सायंबर**
मुख्य कार्यकारी संचालक

**विशेष सूचना:-**
१. गणपूर्ती अभावी सभा तहकुब झाल्यास या सभेचे कामकानज त्याठिकाणी त्याच दिवशी अर्ध्या तासानंतर सुरू होईल. त्यास गणपूर्तीची आवश्यकता असणार नाही.
२. ज्या सभासदांना संस्थेच्या कामकाजाबाबत काही प्रश्न, सुचना मांडावयाचे असतील त्यांनी सुचना व प्रश्न लेखी दि. २६/०९/२०२५ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाठवावेत. ऐनवेळी विचारलेल्या प्रश्नांचा विचार केला जाणार नाही.

# पत्रकार शिक्षक पांडुरंग गोरकर यांचे निधन

बीड /प्रतिनिधी

चंपावती विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक पांडुरंग अंबादास गोरकर सर (वय ७५) यांचे शुक्रवार दि.१९ सप्टेंबर रोजी सकाळी १०.३० वाजता हृदय विकाराच्या धक्क्याने निधन झाले.



पांडुरंग गोरकर सर यांनी चंपावती विद्यालयातून सेवानिवृत्त झाल्यानंतर देखील दीर्घकाळ अध्यापन केले. संघ परिवाराचे देखील ते एकनिष्ठ सदस्य होते. गोरकर सर यांनी अनेक वर्ष पत्रकारिता क्षेत्रातील देखील आपल्या वेगळा ठसा उमटविला. त्यांनी दै.तरुण भारतमध्ये बीड जिल्हा प्रतिनिधी म्हणून दीर्घकाळ कर्तव्य बजावले. पेन्शनर्स ॲण्ड सिनिअर सिटीजन्स असोसिएशनचे ते संस्थापक अध्यक्ष होते. वयोवृध्द पेन्शनर्सच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून अधिकार्यांना आंमत्रित करुन ते पेन्शनर्सचे प्रश्न सोडवत असत. दर वर्षी पेन्शनर्ससाठी आरोग्य शिबीराचेही आयोजन ते करत असत. अनेक सामाजिक, धार्मिक कार्यात ते सक्रीय सहभाग घ्यायचे. शिक्षक, पत्रकार, पेन्शनर्सच्या न्याय हक्कासाठी लढणारे व्यक्तीमत्व आज काळाच्या पडद्या आड गेल्याने अनेकांनी विविध माध्यमाद्वारे शोक व्यक्त केला. पांडुरंग गोरकर सर यांच्या पार्थिवावर मोंढा भागातील स्मशानभूमीत रात्री ८.३० वाजता अत्यंसंस्कार करण्यात आले. यावेळी प्रतिष्ठीत नागरीक, पत्रकार, वकील, डॉक्टर, व्यापारी, नातेवाईक व नागरीकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुली, एक मुलगा, सुना, नातवंडे असा परिवार आहे. गोरकर परिवारावर कोसळलेल्या दु:खात दैनिक समर्थ राजयोग परिवार सहभागी आहे.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
**दहिवाळ सुवर्णकार**
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## संपादकीय

# जगातील सर्वात मोठ्या कराराचे वेध

अमेरिकन शुल्कामुळे बेजार झालेल्या भारतीय अर्थव्यवस्थेला जगातील सर्वात मोठा करार खुणावतो आहे. गेल्या दोन वर्षांपासूनचे अथक परिश्रम फळाला येण्याची चिन्हे आहेत. हे ईप्सित साध्य झाले, तर मोठा अध्यायच लिहिला जाईल.

रशियाकडून तेल खरेदी करीत असल्याची जबर शिक्षा म्हणून अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय मालावर थेट ५० टक्के आयात शुल्क लागू केले आहे. त्यामुळे भारत-अमेरिकेतला १२९ अब्ज डॉलरचा व्यवहार अडचणीत आला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेला हा मोठा झटका आहे. कारण, भारतीय वस्तू अमेरिकेत निर्यात होण्याचे प्रमाण सर्वाधिक आहे. या अडचणीच्या वरवंट्यात मात्र आशेचा किरण निर्माण झाला आहे. भारताने यापूर्वीच इंग्लंडसोबत मुक्त व्यापार करार केला आहे. आता जगातील सर्वात मोठा मुक्त व्यापार करार भारताच्या पुढ्यात येऊन ठेपला आहे. तो प्रत्यक्षात आला, तर जागतिक अर्थव्यवस्थेवर त्याचा मूलगामी परिणाम होणार आहे. शिवाय २०४७पर्यंत विकसित भारताकडे नेण्याच्या संकल्पात तो मैलाचा दगडही ठरणार आहे.

अमेरिकेने शुल्क लादल्यानंतर यासंदर्भात भारताकडून उघडपणे नाराजी, टीका-टिपण्णी किंवा सडेतोड उत्तर देण्यात आलेले नाही. यापुढेही ते दिले जाणार नाही. भारतीय परराष्ट्र धोरण हे आक्रमक आणि आक्रस्ताळे कधीच नव्हते. भविष्यातही ते नसेलच. शिवाय कुणा एका गट किंवा महाशक्तीच्या बाजूने उभे राहण्याचा प्रघात मोडून अलिप्ततेचा पुरस्कार भारताने केला आहे. पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू यांच्या या धोरणाची अजूनही कसोशीने अंमलबजावणी केली जाते, कारण त्यात सर्वाधिक हित दडलेले आहे. यामुळे समांतर विकासाची कवाडे खुली होतात, शिवाय ठराविक शिक्का बसण्यापासूनही सुरक्षित राहता येते. स्वातंत्र्यानंतर आठव्या दशकातही या धोरणातली दूरदृष्टी प्रतित होते. अमेरिकन शुल्कवाढीला प्रत्युत्तर देण्यासाठी एका मोठ्या संधीने भारतासमोर दरवाजा ठोठावला आहे आणि ती आहे युरोपियन महासंघासोबतच्या मुक्त व्यापार कराराची.

एकूण २७ देशांचा समूह असलेला युरोपियन महासंघ हा अनेक श्रीमंत, अग्रेसर आणि तंत्रनिपुण समजला जातो. इतिहासात डोकावता यातील अनेक देशांनी जगावर राज्य करण्याचा मनसुबा प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला. तो फसला. दोन विश्वयुद्धांनी पोळलेल्या युरोपीय देशांनी शांतीची कास धरत नाटोसारख्या संघटनेत सहभागी होण्याचा निर्णय घेतला. सध्या रशियाचे आक्रमण पाहता युरोपीय देशांच्या पोटात गोळा आला आहे. पोलंडच्या वेशीवर काही विपरीत घटना घडल्या आहेत. त्यामुळे धास्तावलेले युरोपीय देश सुख आणि समृद्धीची आस धरून आहेत. गेल्या दोन वर्षांपासून भारतासोबत युरोपियन महासंघाची व्यापार कराराबाबत बोलणी सुरू आहे. भारताने इंग्लंडसोबत मुक्त व्यापार करार करून एक पाऊल पुढे टाकले आहे. आता महासंघासोबत मुक्त व्यापार करार झाला, तर उर्वरित २६ देशांची बाजारपेठ भारताला खुली होणार आहे. विशेष म्हणजे, युरोपियन महासंघाचा अद्याप कुठल्याही मोठ्या देशाशी मुक्त व्यापार करार झालेला नाही. त्यामुळे तब्बल २७ देशांचा प्रथमच कुणा सक्षम देशाशी मुक्त व्यापार करार होणार आहे. तो ऐतिहासिक तर ठरेलच शिवाय अनेकर्थाने तो महत्त्वपूर्णही.

जगातील चौथी वेगवान अर्थव्यवस्था बनलेल्या भारतासाठी युरोपीय बाजारपेठ अत्यंत उपयुक्त आहे. अमेरिकेत निर्यात होणाऱ्या अनेक वस्तू आणि पदार्थ हे युरोपच्या बाजारपेठात विक्री होऊ शकणार आहेत. २०२४ मधील आकडे पाहता भारताच्या एकूण निर्यातीत युरोपचा वाटा ११.५ टक्के आहे. भारत आणि युरोपियन महासंघाचा व्यापार तब्बल १२० अब्ज युरो एवढा आहे. मुक्त व्यापार करार झाला तर हा व्यापार नजीकच्या काळातच थेट दुप्पट होण्याची चिन्हे आहेत.

# श्री योगेश्वरी मल्टिस्टेट को- ऑप क्रेडीट सोसायटी लि. ही गरजवंतांच्या आर्थिक स्थैर्यासाठी सदैव कटिबद्ध - अध्यक्ष रिकबचंद सोळंकी

## मल्टिस्टेटच्या १२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांना १०% लाभांश जाहीर

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

श्री योगेश्वरी मल्टिस्टेट को - ऑप क्रेडिट सोसायटी लि. या संस्थेचा सन २०२४-२५ या वर्षाची १२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात आद्यकवी मुकुंदराज सांस्कृतिक सभागृहात संस्थेचे सर्व सभासद, ग्राहक,ठेवीदार व हितचिंतक यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष रिकबचंद सोळंकी यांनी संस्थेचा वार्षिक अहवाल सादर केला. याप्रसंगी त्यांनी श्री योगेश्वरी मल्टिस्टेट ही संस्था गरजवंतांच्या तसेच निराधारांच्या आर्थिक स्थैर्यासाठी सदैव कटिबद्ध असल्याचे आवर्जून उल्लेखित केले. संस्थेचा सन २०२४-२०२५ चा १२ वा वार्षिक अहवाल सादर करतांना मार्च २०२४ अखेर रुपये ९९ लाखाचा निव्वळ नफा झाल्याची माहिती सांगत सभासदांना १०% लाभांश जाहीर केला. अध्यक्ष रिकबचंद सोळंकी हे संस्थेचा २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये संस्थेचा अहवाल सादर करताना बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर संस्थेचे संस्थापक राजकिशोर मोदी, अध्यक्ष रिकबचंद सोळंकी यांच्यासह संस्थेचे सर्व सन्माननीय संचालक उपस्थित होते.

संस्थेचा १२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत सर्वप्रथम शहराचे आराध्यदैवत श्री योगेश्वरी देवीच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यांनंतर आर्थिक वर्षात निधन झालेल्या संस्थेच्या ग्राहक व हितचिंतकांना आदरांजली अर्पण करण्यात आली. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष ढगे यांनी मागील सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त सादर केले. प्रारंभी त्यांनी उपस्थित सर्व ग्राहक तसेच ठेवीदार, सभासद यांच्यासह संस्थापक राजकिशोर मोदी यांचे स्वागत केले. संस्थापक राजकिशोर मोदी यांनी अंबाजोगाई शहर व परिसरातील नागरिकांसठी श्री योगेश्वरी मल्टिस्टेट ची स्थापना केली. या संस्थेद्वारे हजारो तरुण बेरोजगार , व्यापारी तसेच शेतकऱ्यांना त्यांना त्यांच्या अडचणीच्या काळात आर्थिक सहकार्य केले असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष ढगे यांनी याप्रसंगी नमूद केले. त्यानंतर वार्षिक




सभेपुढे ऐनवेळी येणाऱ्या विविध विषयांवर चर्चा होऊन त्यास मंजूरी घेण्यात आली.

आपल्या अध्यक्षीय भाषणात रिकबचंद सोळंकी यांनी संस्थेस मिळालेल्या या अभूतपूर्व यशाचे श्रेय हे श्री योगेश्वरी मल्टिस्टेट चे संस्थापक राजकिशोर मोदी यांच्या मार्गदर्शन व प्रेरनेला दिले. तसेच मल्टिस्टेटचे उपाध्यक्ष शेख अन्वर हुसेन शेख वली हसन ,संचालक सुधाकर टेकाळे , ॲड विलास लोखंडे, ॲड अनिल लोमटे , विलास सिद्राम जाधव , भागवत रामकृष्ण मसने , संकाये अप्पासाहेब त्रिंबकआप्पा, शेख मुक्तार फकीर अहमद, तज्ञसंचालक लक्ष्मीकांत बजाज, कांतीलाल शर्मा तसेच संचालिका श्रीमती आशालता वांजरखेडकर , सौ. खडके मंदाकिनी बाजीराव यांच्यासह संस्थेचे सभासद, ग्राहक , ठेवीदार ,आणि कर्जदार यांना दिले.


योगेश्वरी मल्टिस्टेट चे अध्यक्ष रिकबचंद सोळंकी यांनी २०२५ चा वार्षिक ताळेबंद देतांना प्रथमतः त्यांनी संस्थापक , मार्गदर्शक राजकिशोर मोदी यांचे संस्थेने १२ वर्ष यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.सर्व सभासद , ग्राहक ,आणि संस्थेच्या हितचिंतकांचे देखील आभार याप्रसंगी व्यक्त केले . सध्याच्या परिस्थिती मध्ये अनेक बँका , पतसंस्था , मल्टिस्टेट सोसायटी या अनेक अडचणींना सामोरे जात आहेत. तर काही दिवाळखोरीत निघाल्या आहेत असे असताना देखिल श्री योगेश्वरी मल्टिस्टेट को ऑप क्रेडिट सोसायटी ही नेत्रदीपक कामगीरी करत असल्याचे आनंदाने सांगितले . यात संस्थेच्या ग्राहकांचा , ठेवीदारांचा , खातेदार आणि हितचिंतक यांचा देखील मोलाचा वाटा असल्याचे देखील सोळंकी यांनी आवर्जून स्पष्ट केले .

पुढे संस्थेच्या आर्थिक विवेनचन करतांना अध्यक्ष रिकबचंद सोळंकी यांनी मार्च २०२५ अखेर १७२८ सभासद असल्याचे सांगितले . संस्थेचे भाग भांडवल एकूण ७० लाख रुपये असल्याचे स्पष्ट केले . तसेच संस्थेकडे एकूण ठेवी रुपये २६ कोटी एवढया असून संस्थेच्या वतीने सभासद व ग्राहकांना एकूण कर्जवाटप हे रुपये १८ कोटी एवढे झाले असल्याचे यावेळी नमूद केले . त्याचबरोबर संस्थेची एकूण गुंतवणूक अंबाजोगाई पिपल्स बँक रुपये १२ कोटी, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले महिला नागरी सहकारी पतसंस्था २ कोटी, आदर्श मल्टिस्टेट परळी ४१ लाख, त्याचबरोबर आदर्श नागरी सहकारी पतसंस्था ४१ लाख एवढी असून एकूण १५ कोटी रुपयांची गुंतवणूक केली असल्याचे अध्यक्ष रिकबचंद सोळंकी यांनी सांगितले. संस्थेचे लेखा परीक्षण मे अंकित जैस्वाल यांनी करत अहवालात संस्थेचा एन पी ए हा ४.२ एवढा दाखवण्यात आला आहे त्याचबरोबर आर्थिक वर्ष मार्च २०२५ अखेर श्री योगेश्वरी मल्टिस्टेट या संस्थेने ६५ लाख रुपये एवढा निवळ नफा मिळविला असल्याचे आवर्जून सोळंकी यांनी सांगितले. झालेल्या या नफ्यातूनच संस्थेच्या सर्व सभासदांना १०% लाभांश देण्याचे याप्रसंगी जाहीर केले.संस्थेकडून ग्राहक तसेच ठेवीदारांना अत्यंत किफायतशीर असे व्याजदर देण्यात येते.

# अस्मानी पाठोपाठ सुलतानी संकट बळीराजाच्या मानगुटीवर

परळी / प्रतिनिधी

खरीप हंगामात बीड जिल्ह्यात विशेषतः परळी व धारूर तालुक्यातील गुणवरा, पापनाशी, वाण यासह अनेक नद्यांच्या खोऱ्यात १५ सप्टेंबर रोजी मध्यरात्री अतिवृष्टी होऊन मोठ्या प्रमाणात शेती, माती व त्यावरील पिके, पशुधन आणि कृषी साहित्याचे मोठे नुकसान झाले. पूरग्रस्त भागात अक्षरशः शेती वाहून दगड-मुरूम उघडा पडला असून या सर्व परिस्थितीत शेतकरी, आर्थिक, मानसिकदृष्टीने खचून गेला आहे. शासनाने या सर्व परिस्थितीचे वास्तविक पंचनामे करून हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत तात्काळ देण्यात यावी अशी मागणी किसान सभेच्या शिष्टमंडळाने शुक्रवार दि १९ रोजी उपजिल्हाधिकारी परळी यांच्याकडे भेट देऊन निवेदनाद्वारे केली आहे.



परळी तालुक्यातील अनेक नद्या, नाल्याना सप्टेंबर महिन्यात विशेषतः दि १५ सप्टेंबर रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर पूर आला. या पुरात वाहून गेल्याने अनेकांना आपला जीव देखील गमवावा लागला आहे. अतिवृष्टीमुळे वहिती शेत जमिनी वाहून जाण्याचे मोठे प्रकार घडले असून नदीपात्राच्या दोन्ही बाजूला असणारे, तसेच ओढ्या नाल्यालगत असणारी शेती अक्षरशः नदी पात्रात रूपांतरित झाली आहे. नदीलगत व ओढ्यालगत असणाऱ्या सर्व शेतकऱ्यांच्या शेतीला याचा मोठा फटका बसला असून सोबतच वाहून गेलेली शेती, मृत्युमुखी पडलेली पाळीव जनावरे, स्प्रिंकलर, ठिबक संच, बैलगाडी व इतर शेती उपयोगी अवजारे, बुजलेल्या विहिरी, घरे, विद्युत मोटार यांच्या झालेल्या नुकसानाचा आढावा घेऊन भरीव मदत करण्यात यावी. खचलेले रस्ते, वाहून गेलेले पूल दुरुस्ती, खंडित वीज पुरवठा सुरळीत करणे आदी कामे वेगाने करण्यात यावी. मराठवाड्यात बीड जिल्ह्यात देखील एप्रिल-मे व जुलै ते सप्टेंबर या काळात मोठ्या प्रमानावर पिकांचे नुकसान झाले असून सरकारने नांदेड व परभणी या दोनच जिल्ह्याकरिता मदत जाहीर केली आणि ते ही तुटपुंजी याचा किसान सभेने निषेध करत नुकसानग्रस्थाना हेक्टरी ५० हजार व पीक नुकसानाची मदत तात्काळ शेतकऱ्याना देण्यात यावी अथवा येत्या काळात किसान सभा सरकारच्या या निर्णयाविरोधात आक्रमक भूमिका घेईल असा इशारा देण्यात आला.

शुक्रवार दि १९ रोजी किसान सभेचे जिल्हाध्यक्ष कॉ.एड.अजय बुरांडे यांच्यासह, जिल्हा सचिव कॉ.मुरलीधर नागरगोजे,



# विद्यार्थ्यांनी शिक्षणा बरोबरच खेळातही प्राविण्य मिळवावे -आ.नमिता मुंदडा

केज/प्रतिनिधी

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी तथा जिल्हा क्रीडा परिषद,बीड आणि केज तालुका क्रीडा कार्यालय केज आयोजित तालुका स्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा केज येथील साने गुरुजी निवासी विद्यालयाच्या क्रीडा मैदानावर आयोजित करण्यात आल्या आहेत सन २०२५-२६ मध्ये आयोजित केलेल्या तालुकास्तरीय शालेय खो-खो क्रीडा स्पर्धेचे केज विधानसभा मतदार संघाच्या विद्यमान आमदार सौ.नमिता मुंदडा यांच्या हस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले यावेळी आमदार नमिता मुंदडा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की,शिक्षणा बरोबरच खेळांकडे सुध्दा विद्यार्थ्यांनी लक्ष देउन प्राविण्य मिळवले पाहिजे.यामुळे आपल्या भविष्यात याचा फायदा नक्की होतो.मला सुद्धा खेळाची आवड आहे मी सुद्धा लॉन टेनिस खेळत होते.खेळामुळेच मला पाहिजे त्याकॉलेज मध्ये प्रवेश मिळाला होता.अभ्यासा बरोबर खेळ सुद्धा महत्वाचा आहे.यामुळे आरोग्य सुद्धा सुधारते त्यामुळे खेळ जीवनात आवश्यक आहे.तालुका स्तरीय खो खो स्पर्धेत केज तालुक्यातील एकुण २२ मुलींच्या संघाने सहभाग नोंदवून उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले.कार्यक्रमाचेअध्यक्ष साने गुरुजी निवासी विद्यालय केजच्या प्राचार्य डॉ.श्रीमती कविता कराड-गित्ते मॅडम व प्रमुख उपस्थिती तालुका क्रीडा अधिकारी श्रीमती राखी यादव मॅडम त्याच बरोबर विनोद गुंड,भगवान केदार,डॉ.वासुदेव नेहरकर,सुनिल आबा गलांडे,सुदाम पाटील, शरद इंगळे,सुनिल घोळवे,विष्णू थोरात, खदिर कुरेशी,महादेव जाधवर,अरुण शेप,रामदास सानप,बर्डे सर,नागरगोजे सर, नेहरकर सर,संजय इंगळे सर,श्रीमती दिपाली कांदे व विद्यार्थी यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचेसूत्रसंचालन श्रीमती डोंगरे मॅडम व कार्यक्रमाचे व मान्यवरांचे आभार

# नारायणगड च्या दसरा मेळाव्यासाठी स्वयंसेवक तनमनधनाने श्रमदानातुन करु लागले तयारी...

## मठाधिपती शिवाजी महाराज यांच्या हस्ते झाला शुभारंभ



कोळगाव बाळासाहेब घाडगे- महाराष्ट्राची धाकटी पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्रीक्षेत्र नारायणगड चे मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत दि.२ ऑक्टोबर रोजी नारायणगड च्या या या वर्षीचार दसरा मेळावा घेण्यासाठी सर्व भक्तगणासह जात धर्म पंथ समाजातील पंथातील भक्तगण सरसावला आहे. हा दसरा मेळावा मोठ्या उत्साहात पार पडण्यासाठी स्वयंसेवक तनमनधनाने श्रमदानातुन तयारी करु लागले. या कामाचा शुभारंभ मठाधिपती शिवाजी महाराज, संपादक गंगाधर काळकुटे पाटील, स्वयंसेवक यांच्या उपस्थितीत झाला.

धाकटी पंढरी नारायणगडावर मागील वर्षीचा दसरा मेळावा संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत ऐतिहासिक दसरा मेळावा लक्ष लक्ष चरण स्पर्शाने जागतिक स्तरावरचे रेकॉर्ड झाले. दरम्यान यंदाच्या दसरा मेळाव्याची घोषणा आझाद मैदानावरील आंदोलन हैदराबाद गॅझेट सातारा गॅझेट सह पाच मागण्या मान्य झाल्या व महाराष्ट्रातील समस्त मराठा बांधवांना आरक्षण विजयाचा विश्वास आनंद केला. मनोज जरांगे पाटील यांनी विजयी दर्शन दि.०८ सप्टेंबर नारायणगड नतमस्तक होऊन दिनांक ०२ ऑक्टोबर २०२५ रोजी दसरा मेळाव्याची घोषणा झाली. दरम्यान या अनुषंगाने दसरा मेळाव्यास येणाऱ्या भाविक भक्तांची समाजाची गैरसोय होऊ नये म्हणून कामाचा शुभारंभ मठाधिपती शिवाजी महाराज, संपादक गंगाधर काळकुटे पाटील, स्वयंसेवक यांच्या उपस्थितीत झाला. नारायणगड संस्थान च्या वतीने मैदान साफ सफाई करणे, रस्ता, पाणी पुरवठा, पार्किंग व्यवस्था बरोबर अल्पोपहाराची सोय होणार असून तब्बल संस्थानच्या वतीने करण्यात येत आहे. वेगवेगळ्या समित्या स्थापन करणे, स्टेज,मंडप उभारण्याची तयारी, पार्किंग व्यवस्था नियोजन, गावागावांत बैठकीचे आयोजन करण्यात येणार आहे असे आमचें प्रतिनिधी बाळासाहेब घाडगे यांच्याशी बोलताना नारायणगड चे मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांनी सांगितले.

श्रमदानासाठी स्वयंसेवकांनी घेतला पुढाकार...

आज दि.१९ सप्टेंबर रोजी पोखरी साठेवाडी काळेवाडी

येथील गावकरी युवक महिला तसेच जेष्ठ नागरिक स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गडावर दिवसभर दसरा मेळाव्याच्या पूर्वतयारीसाठी शेकडो भक्तगण, समाजसेवक, दाखल होत असून आपला हातभार तन-मन-धनाने लावत आहे. यावेळी पोखरी, साठेवाडी काळेवाडी येथील गावकरी युवक महिला यांनी श्रमदान केले. या श्रमदानामध्ये संपादक गंगाधर नाना काळकुटे पाटील, माजी सभापती नारायण काशीद, युवा उद्योजक तथा गडाचे भक्त गणेश नलवडे, शिवव्याख्याते ज्ञानदेव काशीद, पत्रकार बाळासाहेब घाडगे, नवनाथ काशीद, गणेश हाडोळे रामप्रसाद पवार आदी नागरिक सहभागी होते. यावेळी गडाच्या वतीने वनभोजनाचा आस्वाद घेतला. तरी दसरा मेळाव्याच्या तयारीसाठी स्वयंसेवक यांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले.

यावर्षीही उत्सव विजयी दसरा मेळाव्याचा होणार - गंगाधर काळकुटे पाटील

गरजवंत मराठ्यांचा लढा लढणारे करोडो समाज बांधवांना आपले आई वडील मानणारे संघर्षयोध्दा मनोज जरांगे यांनी नारायणगड वर दि.१२ ऑक्टोबर २०२४. रोजी मागील वर्षी चा दसरा मेळावा रेकॉर्ड ब्रेक केल्यामुळे या या दसरा मेळाव्याचे सर्वत्र कौतुक आणि विरोधकांना धडके भरणार होता. पण संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील आणि नारायणगड अठरा पगड जातीधर्माच्या समाजातील लोकांना घेऊन जाणारं नेतृत्व आहे. यामुळे लाखो समाज बांधव या दसरा मेळाव्याचे साक्षीदार झालेले आहे. नुकतेच झालेल्या मुंबईतील आंदोलकांने हैदराबाद गॅझेट सातारा गॅझेट अंमलबजावणी कुणबी नोंदनंतर समाजाला फायदा होणारा असून मोठा आनंद आहे. दरम्यान मागील वर्षी वर्षापासून संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील, धाकटी पंढरी नारायणगड, मठाधिपती महंत गुरुवर्य प्रेममुर्ती शिवाजी महाराज दसरा मेळावा चर्चेत राहिलेला विषय आहे. यावर्षीही उत्सव विजयी दसरा मेळाव्याचा आहे तसेच आपली परंपरा यानूसार दसरा मेळाव्याची जय्यत तयारी, जाहिरात प्रसिद्ध मनोज जरांगे पाटील यांचे लाखो चाहते, नारायणगड चे भक्त सेवेकरी मोठ्या उत्साहात करत आहे. यामुळे चांगला दसरा मेळावा होणार आहे. असे संपादक गंगाधर काळकुटे पाटील यांनी सांगितले

### शैक्षणिक कागदपत्रे हरवले आहेत

डॉ.यशराज सिंहराज सम्राट यांचा बीड ते मुंबई प्रवासादरम्यान १२ वी विज्ञान पासचा टी.सी., मार्क्स मेमो तसेच ईतर शैक्षणिक कागदपत्रे गहाळ झाले आहेत.

सापडल्यास खालील मोबाईल क्रमांकावर संपर्क करावा.

मो.नं.9404720712




देगलूर /प्रतिनिधी

देगलूर : शहरातील प्रभाग क्रमांक १० मधील रस्ता लोकापर्ण तसेच जिल्हा परिषद शाळेजवळील सिमेंट कॉँक्रीट रस्त्याच्या कामाचे भूमिपूजन गुरुवारी आमदार जितेश अंतापूरकर यांच्या हस्ते पार पडले.यावेळी उपस्थित नागरिकांशी संवाद साधताना आ. अंतापूरकर म्हणाले, देगलूर शहराचा सर्वांगीण विकास हेच माझे अंतिम ध्येय आहे. विकास हा फक्त कागदावर नव्हे, तर प्रत्यक्ष जमिनीवर दिसायला हवा. मी जे बोलतो ते कृतीत उतरवतो. माझा प्रत्येक निर्णय हा जनतेच्या हितासाठीच असतो. आगामी काळात देगलूर शहर राज्यभर एक विकासाचं मॉडेल ठरेल. मात्र या प्रवासात लोकसहभाग आणि जनतेचा विश्वास तितकाच महत्त्वाचा असून, तो माझ्यासोबत आहे.

या कार्यक्रमाला देगलूर नगरपालिकेच्या मुख्याधिकारी नीलिमा कांबळे, माजी नगराध्यक्ष शंकर कंतेवार, भाजप शहराध्यक्ष प्रशांत दासरवार, दीपक शहाणे, जनार्दन बिरादार, नगरसेवक बालाजी रोयलावार, सुभाष कलेटवार, दीपक संगमकर, रोहित कंतेवार, भावना दाशेटवार, अनिल कमटलवार, पालिका अभियंता विजय ईटकापले, इम्तियाज हुसेन यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.



# ना.पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते प्रा.बिभिषण चाटे यांचा सन्मान

### बीड जिल्हा पत्रकार संघाचा पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात संपन्न

मानूर (प्रतिनिधी)

महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री आणि जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री माननीय पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांच्या हस्ते बुधवारी लेखन, निवेदन आणि शिक्षण क्षेत्रामधील गुनी व्यक्तिमत्व प्रा. बिभिषण चाटे यांचा आदर्श शिक्षक पुरस्काराने विशेष गौरव करण्यात आला.यावेळी चाटे सर यांच्या सकारात्मक लेखणीचे कौतुक केले.

बीड जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने आयोजित बीड येथील पुरस्कार वितरण समारंभात हा सन्मान करण्यात आला. यावेळी मंचावर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, बीड जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष मानूरकर, भाजपाचे बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, अल्पसंख्यांक आघाडीचे नेते समीर काजी, भाजपाचे प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी, संपादक वैभव स्वामी, संपादक बालाजी तोंडे यांच्यासह जेष्ठ कार्यकर्ते नवनाथ शिराळे, अशोक लोढा आदीसह मान्यवरांची उपस्थिती होती.

याप्रसंगी या विशेष गौरवाबद्दल प्रा.बिभीषण चाटे यांचे नॉलेज प्लांटच्या मुख्य संचालिका गीतांजली जायभाये, गणिततज्ञ विठ्ठल जायभाये, के एस के कॉलेजच्या उपप्राचार्य श्रीमती डॉ. शिंदे मॅडम, संयोजन समिती अध्यक्ष नितीन क्षीरसागर, उपसंपादक अमोल पटवारी, डॉ.अशोक देवगुडे, सर्जेराव वारे, ग्राम पंचायत अधिकारी श्रीमती सविता वारे, भाग्यश्री ताई गडदे, ह भ प सुदाम महाराज पानेगावकर, प्रा. सुनील डिसले, डॉ. रमेश भराटे, ह भ प सोमनाथ महाराज ढाकणे, युवा नेते आदित्य लांडे पाटील, मुकुंद आरे पाटील, सभापती सुवर्णाताई लांबरुड, ड. संजय सानप, अर्जुन घुगे सर, अशोक गवळी, प्रा.लेनगुरे,इन्स्पेक्टर राजेंद्र दराडे, कृषी अधिकारी शकुंतला चाटे, डॉ. आत्माराम आंधळे, प्रा. विकास गवई, शाहीर अनंत मुंडे, पत्रकार अनिल गायकवाड, शाम गर्जे, ग्रंथपाल उगले, प्रा. शांतीलाल जायभाये, मुख्याध्यापक देवडे पाटील, मंगेश पवार, शौकत आली, आनंद टाकळकर, ड.अनिल लोमटे, डॉ.अमोल सोनकांबळे यांच्यासह शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले.

सकारात्मक, प्रमाणिक लेखणीची फलश्रुती!

# तालुकास्तरीय राष्ट्रीय विज्ञान नाट्य उत्सवात डॉ. सोनाजीराव रांजवण विद्यालयाची नाटिका सर्वप्रथम

तालुकास्तरीय राष्ट्रीय विज्ञान नाट्य उत्सवाचे आयोजन आज दि. १९ सप्टेंबर २०२५ रोजी डॉ. सोनाजीराव रांजवण माध्यमिक विद्यालय वडवणी येथे करण्यात आले होते.

या विज्ञान नाट्य उत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थी शिक्षक आणि जनसामान्य यांना वैज्ञानिक माहिती घटना आणि संकल्पना मनोरंजक पद्धतीने देता यावे तसेच विज्ञान नाट्यातून विज्ञान लोकप्रिय व्हावे आणि मनोरंजनासोबत समाज प्रबोधन व्हावे या हेतूने हा उपक्रम दरवर्षी आयोजित केला जातो.

यावर्षी राष्ट्रीय विज्ञान नाट्य उत्सवचा मुख्य विषय पुढीलप्रमाणे होता

मानव कल्याणासाठी विज्ञान व तंत्रज्ञान ( डलळशपलश -पव ढशलहपेश्रेसू त्रॅ ढहश इशपशषळीं जष चरपज्ञळपव) त्या अंतर्गत पुढील प्रमाणे पाच उपविषय दिलेले होते-



विज्ञानातील महिला,स्मार्ट ( नाविन्यपूर्ण ) शेती.,डिजिटल भारत जीवनसक्षमीकरण.,सर्वांसाठी स्वच्छता. व हरित तंत्रज्ञान. त्यातीलच डिजिटल भारत जीवन सक्षमीकरण या विषयावरती डॉ. सोनाजीराव रांजवन विद्यालयाच्या चमूतील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट असा अभिनय करत तालुक्यातून सर्वप्रथम क्रमांक पटकवला.

या नाट्यस्पर्धेत विद्यालयातील इयत्ता ६ वी ते ८वी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला कु. समृद्धी वाघमारे, सायली मंडलिक, चि. सम्राट सरपते, श्रेयश गायकवाड, सुजल भंडारे, गणेश शिंदे, शिवम मुंडे व तन्मय चव्हाण इ. विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट अभिनय केला व तालुक्यातून निवड होऊन आगामी जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी त्यांची निवड करण्यात आली आहे. या नाट्यस्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना सांस्कृतिक व विज्ञान विभाग प्रमुख बी. एन. जाधव सर यांचे मार्गदर्शन लाभले.

या विज्ञान नाट्यउत्सवाचे परीक्षक म्हणून प्रा. पाटील सर व प्रा. शेळके मॅडम यांनी काम पाहिले. या विजयी संघांचे अभिनंदन व कौतुक वडवणीचे गटशिक्षणधिकारी मा.बाबासाहेब उजगरे साहेब विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य मा. यशवंतराव भोसले सर, पर्यवेक्षक मा. जयदेव लांडे सर यांनी केले. व पुढील जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. मान्यवरांच्या हस्ते विजयी संघाचा पुष्पगुच्छ व प्रमाणपत्र देऊन स्वागत व सन्मान करण्यात आला. तालुकास्तर राष्ट्रीय विज्ञान मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी गटसाधन केंद्रातील साधनव्यक्ती श्रीमती मैमुना मॅडम(तालुका समन्वयक) यांनी काम पाहिले.

# पाटोदा तहसील वरती शेतकऱ्यांचा हल्लाबोल

पाटोदा (प्रतिनिधी)

पाटोदा तालुक्यातील सर्व मंडळामध्ये अतिवृष्टी झाली आहे त्यामुळे शेतकऱ्याच्या पिकाचे अतोनात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना या संकटातून बाहेर काढण्यासाठी शासनाने मदत करावी या मागणीचे निवेदन शेतकऱ्यांच्या वतीने देण्यात आले. १) शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान द्या. २)शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी झाली पाहिजे. ३)कांदा उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान द्या. ४)एक वर्षापासून सौर पंपाचे पैसे भरून घेतले ते तात्काळ बसून द्या. ५)ई पिक पाहणी सरोवर चालत नसून तलाठ्याला इ पिक पाहणी करण्याचे आदेशित करावे. या प्रमुख मागण्या निवेदनाद्वारे करून उपविभागीय अधिकारी श्रीमती वसीमा शेख यांच्याकडे तालुक्यातील शेतकऱ्यांच्या वतीने देण्यात आले मागण्या मान्य न झाल्यास शेतकऱ्याचे तालुक्यांमध्ये खूप मोठे आंदोलन उभा करण्यात येईल असा इशारा देण्यात आला. यावेळी राष्ट्रवादीचे




ज्येष्ठ नेते शिवभूषण जाधव, गणेश कवडे. संचालक कृषी उत्पन्न बाजार समिती पाटोदा.सय्यद साजिद भाई, राजाभाऊ राऊत, बापूराव भवर, पत्रकार कादरभाई मकरानी, भाऊसाहेब सानप, भरत भाकरे,देविदास काळे, संजय जाधव, ज्ञानेश्वर नाईकनवरे, नवनाथ जाधव, संतोष घाडगे, परमेश्वर राऊत, विठ्ठल राऊत, अरुण गाडेकर, भीमा गाडेकर, मदन बाप्पा घुमरे, बाबासाहेब घुमरे, हनु सानप, काकासाहेब घुमरे, राजूअण्णा भोसले, दीपक भोसले, ऋषी घुमरे, विठ्ठल गाडेकर, अंकुश भाऊ गुंड, भीमराव घोलप, रामभाऊ बामदळे, बापूराव ढेरे, अश्रू ढेरे, नवनाथ राव जावळे शेकडो शेतकरी यावेळी उपस्थित होते.

# अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई मिळणार: आ. धस

### पाटोदा तालुक्यात प्रशासनाने पीक पंचनाम्याला केली सुरुवात

पाटोदा (प्रतिनिधी)

पाटोदा तालुक्यात गेल्या तीन दिवसांपासून मुसळधार पावसाने माजवला आहे. कुसळंबसह अनेक महसूल मंडळांत अतिवृष्टी झाली. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. पिके पाण्याखाली गेली. काही ठिकाणी काढणीच्या टण्यावर असलेली पिकेही नष्ट झाली. या पार्श्वभूमीवर सर्व शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई दिली जाणार असल्याचे आश्वासन आमदार सुरेश धस यांनी दिले. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलासा



मिळाला आहे. १४ सप्टेंबरला पाटोदा महसूल मंडळात ६७.८ मिलिमीटर पाऊस झाला. १६ सप्टेंबरला दासखेडमध्ये ६७ मिलिमीटर पावसाची नोंद झाली. थेरला महसूल मंडळात १४ सप्टेंबरला ८६ मिलिमीटर, तर १६ सप्टेंबरला पुन्हा ६८ मिलिमीटर पाऊस झाला. यामुळे या भागात दोनदा अतिवृष्टीचा फटका बसला. अमळनेर महसूल मंडळातही १६ सप्टेंबरला ८६ मिलिमीटर पाऊस झाला. कुसळंब परिसरातही जोरदार पाऊस झाला. त्यामुळे शेतीचे मोठे

नुकसान झाले. या अतिवृष्टीचा सर्वाधिक फटका सोयाबीन पिकाला बसला. पाटोदा तालुक्यात सोयाबीन हे मुख्य पीक आहे. हे पीक पाण्यात बुडाले. काही भागात काढणीच्या टण्यावर असलेली पिकेही नष्ट झाली. त्यामुळे शेतकऱ्यांचे संपूर्ण हंगामाचे कष्ट वाया गेले. अनेक शेतकरी आर्थिक संकटात सापडले. प्रशासनाकडून नुकसानीचे पंचनामे सुरू आहेत. काही ठिकाणी पावसामुळे पंचनाम्याला उशीर होतो आहे. मात्र यामुळे भरपाई मिळण्यात अडथळा येणार नाही.

# मॉडर्न इंग्लिश स्कूल च्या विद्यार्थ्यांनी दिली प्राथमिक आरोग्य केंद्रास भेट

## आरोग्य केंद्राची घेतली सविस्तर माहिती

मानूर (प्रतिनिधी)

शालेय आरोग्य सेवा हे सामाजिक आरोग्याचे महत्त्वाचे अंग आहे. सामजिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण आरोग्य सेवा यांचे मार्फत शालेय वयोगटातील मुले आणि मुली यांच्या आरोग्याचे संवर्धन करण्यास मदत होते व शैक्षणिक काल आरोग्यदायी राखण्यास मदत होते.

शालेय आरोग्य कार्यक्रमात शाळेतील आरोग्य विषयक सर्व कार्यक्रम, आरोग्य शिक्षण, बरे होणाऱ्या व दुरुस्त करता येणाऱ्या आरोग्य समस्यांचे निराकरण करणे. आरोग्याच्या चांगल्या सवयी लावणे उदा., स्वतःची व परिसराची स्वच्छता, योग्य तो आहार, व्यायाम, मनोरंजनाच्या चांगल्या सवयी, ज्या योगे उद्याचा एक सुजाण नागरिक बनण्यास मदत होईल अशा बाबींचा समावेश होतो.

शाळेत जाणाऱ्या मुलांची संख्या : एकूण लोकांखेच्या साधारणत: १५% एवढ्या प्रमाणात असते. भारतात शाळेत जाणाऱ्या ५ ते १४ वर्ष वयोगटातील मुलांची संख्या मोठी आहे. त्यांच्यातील आरोग्य समस्यांचे नियोजन करणे जरुरी असते.शालेय मुलांचा वाढ व विकासाचा कालावधी : या कालावधीत मुलांमध्ये शारीरिक, मानसिक व भावनिक बदल मोठ्या प्रमाणात होत असतात. म्हणून त्यांना या काळात आरोग्य निरीक्षण आणि मार्गदर्शन याची नितांत गरज असते.शालेय मुलांमधील रोगांचे लवकर निदान करणे : मुलांना कुपोषण व संसर्गजन्य आजार लवकर होऊ शकतात. त्यांचे शालेय आरोग्य तपासणी कार्यक्रमातून निदान



करता येते.

शालेय मुलांना गटागटात राहणे आवडते : शालेय आरोग्य सेवेचे नियोजन करून त्यांच्या आरोग्यावर देखरेख ठेऊन मार्गदर्शन करता येते. गटात किंवा समूहात राहिल्यामुळे मुलांना संसर्ग होण्याची शक्यता अधिक असते. शाळेत मुलाना झालेला ससर्ग साहजिकच कुटुंब आणि समाजात ही कालांतराने पसरतो.शालेय वयोगटातील मुलांना नियंत्रणात ठेवण्याची अधिक असते : हा गट शिक्षक व आरोग्य कर्मचारी यांनी दिलेल्या सूचनांचे पालन करतो. एकेका वयोगटातील समूहात आरोग्य शिक्षण दिल्यास ते स्वीकारतात.

शैक्षणिक संधी : मुलांचे दृष्टीकोन व सवयी आरोग्यपूर्ण बनविण्यासाठी व आरोग्य शिक्षण देण्यासाठी शाळा ही योग्य जागा ठरते.मॉडर्न इंग्लिश स्कूल हि शाळा सतत काही ना काही वेगळा स्तुत्य उपक्रम घेत असते. विदयार्थ्यांना सभोवताळच्या परिसर अभ्यास म्हणून महिन्यात एकदा तरी शासकीय कार्यालयास भेट देऊन त्या कार्यालयात चालत असणाऱ्या कामाविषयीं विद्यार्थ्यांना माहिती असावी म्हणून हा कार्यालय भेट म्हणून उपक्रम शाळा घेत असते अशी माहिती मुख्याध्यापक माही सर यांनी दिली.आरोग्य केंद्राच्या भेटीमध्ये आरोग्य अधिकारी डॉ. मृणाली घुगे यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर अशी माहिती दिली,

# ना.पंकजाताई मुंडेंच्या हस्ते सुनिल मुंडे आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित

## सहकारी व विद्यार्थ्यांना पुरस्कार केला समर्पित

वडवणी (प्रतिनिधी) वडवणी तालुक्यातील चिंचवण केंद्राचे कार्यतत्पर केंद्रप्रमुख तथा कर्तव्यदक्ष केंद्रिय मुख्याध्यापक सुनिल मुंडे सर यांना नुकताच बीड जिल्हा पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने जाहीर झालेला आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ हा पुरस्कार महाराष्ट्राच्या कॅबिनेट मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या शुभहस्ते व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत बीड येथील पुरस्कार वितरण सोहळ्यात प्रदान करुन सन्मानित करण्यात आले. यावेळी वडवणी तालुक्यातील शिक्षकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

याबाबत अधिक माहिती अशी की, शिक्षण हे केवळ ज्ञान देणे नाही, तर समाज घडवण्याचे एक महान कार्य आहे. या कार्यात अपार निष्ठा, सातत्यपूर्ण प्रयत्न आणि विद्यार्थ्यांप्रती आत्मीयता असलेल्या शिक्षकांचीच खरी ओळख आदर्श शिक्षक म्हणून केली जाते. अशाच एका प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वाचा गौरव बीड जिल्हा पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने करण्यात आला आहे. वडवणी तालुक्यातील चिंचवण केंद्राचे कार्यतत्पर केंद्रप्रमुख तथा कर्तव्यदक्ष केंद्रिय मुख्याध्यापक सुनिल फुलचंदराव मुंडे सर यांची आदर्श शिक्षक पुरस्कार २०२५ साठी गौरवशाली निवड करण्यात



आली होती. शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्य, विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केलेले नवनविन शैक्षणिक दृष्टीकोन व मूल्याधिष्ठीत कार्यपध्दतीची प्रचिती म्हणून त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा सन्मान महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण, वातावरणातील बदल व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांच्या शुभहस्ते बीड याठिकाणी बीड जिल्हा पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने आयोजित एका भव्य आणि उत्साहवर्धक सोहळ्यात प्रदान करण्यात आला. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, बीड जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष मानूरकर, वडवणीचे गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे, केंद्रप्रमुख सैलानी शेख सर, केंद्रप्रमुख सुरेश करांडे सर, केंद्रप्रमुख गणेश धायतिडक सर, केंद्रप्रमुख निलेश चव्हाण सर, केंद्रप्रमुख पवनराजे देशमुख सर, केंद्रप्रमुख प्रकाश गांडगे सर यांच्यासह असंख्य मान्यवर तसेच वडवणी तालुक्यातील कुटुंबीय, शिक्षक बांधव, मित्रपरिवार व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. ज्यामुळे सोहळ्याचे औचित्य अधिकच भव्य आणि संस्मरणीय ठरले. सुनिल मुंडे सर हे गेल्या अनेक वर्षांपासून आपल्या स्वतःच्या शाळेसह केंद्रातील सर्वच शाळांच्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी झटत आहेत. संपूर्ण वडवणी तालुक्यामध्ये चिंचवण केंद्र हे गुणवत्तेची खाण म्हणून ओळखले जाते. नवोन्मेषी उपक्रम, सामाजिक जाणिवा आणि सकारात्मक शैक्षणिक वातावरण निर्मिती हे त्यांच्या कार्याचे वैशिष्ट्य राहिले आहे. केंद्रप्रमुख या जबाबदारी सोबतच त्यांनी एक आदर्श केंद्रिय मुख्याध्यापक म्हणूनही आपल्या कार्याची वेगळी छाप सोडली आहे. त्यांच्या कार्यास मिळालेला हा सन्मान संपूर्ण वडवणी तालुक्यासाठी अभिमानास्पद बाब असून या पुरस्कारानंतर शिक्षण क्षेत्रासह सर्वच स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# विश्वकर्मा प्रकट दिनानिमित्त वडवणी शहरात भव्य दिव्य रथामधून मिरवणूक संपन्न



वडवणी (प्रतिनिधी)

वडवणी शहरात प्रथम च विश्वकर्मा प्रकट दिनानिमित्त दिनांक १८/०९/२०२५ गुरुवार रोजी वडवणी शहरातील विश्वकर्मा महाराज मंदिर येथे विश्वकर्मा प्रकट दिन हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत संपन्न झाला.यावेळीसकाळी काल्याचे किर्तन ह.भ.प.यांचे झाले नंतर दुपारी महाप्रसाद चे आयोजन करण्यात आले होते.दुपारी ५ ते रात्री १० वाजता पर्यंत भव्य दिव्य रथामधून विश्वकर्मा महाराज च्या मुर्ती ची वाजता गाजत जय घोष करत मिरवणूक शांततेत पार पडली.भारतात दिनांक १७ सप्टेंबर हा दिवस विश्वकर्मा दिन आणि त्यांची जयंती म्हणुन साजरा करण्यात येतो. विश्वकर्माची पाच रूपे आणि अवतारांचे वर्णन आपल्या धर्मग्रंथांमध्ये.विश्वकर्मा म्हणजे देवतांचे कारागीर आहे.अशी एक समजूत सर्व सामान्यांमध्ये आढळून येते.पांचाल समाजबांधव ही त्यांला अपवाद नाही.विश्वकर्मा वंशज म्हणून ज्या पाच समाजाची ओळख आहे,ते सुतार, लोहार,सोनार, ताम्रकार,व शिल्पकार हे पाचही समाजबांधव महाराष्ट्रात पांचाळ म्हणून ओळखले जातात.याच समाज च्या वतीने वडवणी शहरात प्रथम भव्य दिव्य रथामधून विश्वकर्मा महाराज ची रथामधून मिरवणूक काढण्यात आली होती.यावेळी समाजाचे अध्यक्ष काशीनाथ घोडके, उपाध्यक्ष सुनील माळी, सचिव महादेव पांचाळ, आकलेश शर्मा, मुकेश शर्मा,राम क्षिरसागर,रामा घोडके,बाळु घोडके, धोंडिराम घोडके, असंख्य समाज बांधवांनी उपस्थित राहुन उत्सव साजरा केला.

# केज येथे भव्य त्रिदिवसीय समर्पण कीर्तन महोत्सव संपन्न



केज/प्रतिनिधी

श्री ज्ञानेश्वरी जयंती व पितृपक्षाचे औचित्य साधून श्रीराम मंदिर, केज येथे भव्य कीर्तन महोत्सव संपन्न झाला. उत्सवाचा प्रारंभ दिनांक १३ सप्टेंबर रोजी ज्ञानेश्वरी जयंती निमित्त ग्रंथराज ज्ञानेश्वरीग्रंथाची पालखीमध्ये मिरवणूक काढून झाला.दि.१३ सप्टेंबर रोजी ह.भ.प. श्री.संतोष महाराज बिडगर यांची कीर्तन सेवा व नंतर दीपोत्सव संपन्न झाला दिनांक १४ सप्टेंबर रोजी ह.भ.प. श्री.बापू महाराज दातार व दि.१५ सप्टेंबर रोजी पुणे येथील सौ. तेजस्विनी कुलकर्णी धानोरकर यांची नारदीय यांची कीर्तन सेवा संपन्न झाली.पुणे येथील प्रसिद्ध हार्मोनियम वादक पंडित गंगाधर देव व तबलावादक श्री. बाळासाहेब अलास्कर यांची साथ-संगत लाभली.महाप्रसादाने या कीर्तन महोत्सवाची सांगता झाली.केज शहरातील व परिसरा तील असंख्य श्रोत्यांनी या कीर्तन महोत्सवाला हजेरी लावली होती या भव्य कीर्तन महोत्सवाला भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याबद्दल संयोजक ह.भ.प.श्री.भालचंद्र महाराज देव व सचिनराव देशपांडे यांनी सर्व भाविकांचे आभार मानले आहेत.

# शासनाच्या चुकीच्या निर्णयाविरोधात अंबाजोगाईत आयएमएचे तीव्र आंदोलन

## शासनाचे परिपत्रक कायदा विरोधी व न्यायालयाचा अवमान करणारे - सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांची माहिती

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण आणि औषध द्रव्ये विभागाने ५ सप्टेंबर २०२५ रोजी परिपत्रक जारी करून सीसीएमपी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या होमिओपॅथिक डॉक्टरांची नोंदणी महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल (एमएमसी) च्या स्वतंत्र रजिस्टरमध्ये करण्याचे निर्देश दिले आहेत. मात्र, या निर्णयाचा भारतीय वैद्यकीय संघटना (आयएमए) महाराष्ट्र राज्याने तीव्र विरोध दर्शविला असून गुरूवार, दिनांक १८ सप्टेंबर रोजी राज्यस्तरीय संप पुकारण्यात आला होता. या संपामुळे अंबाजोगाईसह संपूर्ण महाराष्ट्रात रूग्णसेवा विस्कळीत झाली होती.

यावेळी इंडियन मेडिकल असोसिएशन अंबाजोगाई तर्फे आयएमएचे सांस्कृतिक समितीचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले, डॉ.नवनाथ घुगे, डॉ.विजय लाड, डॉ.उद्धव शिंदे, डॉ.एस.यु.पाटील, डॉ.दिलीप खेडगीकर, डॉ.राहुल धाकडेसह मार्ड संघटनेचे डॉ.निखिल सातपुते, इनर व्हिल क्लबचे प्रा.सुरेखा सिरसाट, प्रा.चंद्रकला देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी संघटनेची भूमिका मांडताना डॉ.राजेश इंगोले यांनी स्पष्ट केले की, बीएचएस डॉक्टर्स आधीच महाराष्ट्र होमिओपॅथिक कौन्सिलमध्ये नोंदणीकृत आहेत. शासनाने घेतलेला हा निर्णय ११ जुलै २०२४ रोजीच्या स्वतःच्या




परिपत्रकाच्या विरोधात असून, यासंदर्भातील खटला माननीय मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित असताना काढलेले हे परिपत्रक कायद्याला धरून नसलेले व न्यायालयाचा अवमान करणारे आहे. होमिओपॅथी आपल्या जागी श्रेष्ठ आहे. परंतु, त्या डॉक्टर्सनि आमची नांवनोंदणी ऍलोपॅथीच्या नोंदणी पुस्तकात करावी ही मागणी अनाकलनीय आहे. होमिओपॅथीचा अभ्यासक्रम पूर्णपणे वेगळा असून त्या पॅथीचे तत्व, उपचार पद्धती संपूर्ण वेगळ्या आहेत. होमिओपॅथी ऍलोपॅथी मध्ये मिक्स करण्याचं सरकारी मिक्स पॅथीचे धोरण हे सर्वसामान्य जनतेच्या प्राणाशी खेळण्याचा प्रयत्न आहे. या निर्णयामुळे रूग्णांच्या सुरक्षिततेवर गंभीर धोका निर्माण होईल, आधुनिक वैद्यकीय शिक्षणाचा तसेच व्यवसायाचा दर्जा घसरेल. तसेच राष्ट्रीय वैद्यकीय आयोग (एनएमसी) आणि महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल कायद्याचे उल्लंघन होईल, अशी भूमिका डॉ राजेश इंगोले यांनी यावेळी मांडली. तर अपुरे प्रशिक्षण घेतलेले डॉक्टरांकडून रूग्णांवर उपचार म्हणजे थेट त्यांच्या जीवाशी खेळ असल्याची भीतीही डॉ.नवनाथ घुगे यांच्याकडून व्यक्त करण्यात आली आहे.

# नवरात्र महोत्सव २०२५ आढावा बैठक तहसीलदार विजय चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न

## भाविकांना कोणतीही अडचण येऊ नये यासाठी प्रशासनाची तयारी

अंबड /प्रतिनिधी :-

मराठवाड्याचे आराध्य दैवत असलेल्या मत्स्योदरी देवी मातेच्या नवरात्र महोत्सव २०२५ ची आढावा बैठक तहसील कार्यालयात संपन्न झाली. या बैठकीस संस्थान अध्यक्ष तथा तहसीलदार श्री. विजय चव्हाण अध्यक्षस्थानी होते.या बैठकीस वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरमवाड, पोलीस निरीक्षक श्री. संतोष घोडके, महावितरण कंपनीचे शहर अभियंता, नगरपरिषद कर्मचारी श्री. परमेश्वर शिंदे, कैलास शिंदे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.



बैठकीदरम्यान पोलीस निरीक्षक संतोष घोडके यांनी नवरात्र महोत्सव काळात वाहन पार्किंग, वाहतुकीची व्यवस्था आणि रस्त्यावरील अडचणी या संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले. भाविकांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस विभागाकडून विशेष पथके तैनात करण्याचे नियोजन करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.बैठकीत तहसीलदार विजय चव्हाण यांनी सांगितले की नवरात्र उत्सवाला मोठ्या प्रमाणावर भाविक देवी दर्शनासाठी येतात. त्यामुळे कोणत्याही भाविकाला अडचण निर्माण होऊ नये यासाठी सर्व विभागांनी समन्वय साधून काम करावे.आरोग्य सुविधा, पिण्याचे पाणी, स्वच्छता, वीजपुरवठा, तसेच सुरक्षा यावर विशेष लक्ष द्यावे.नवरात्र महोत्सवाच्या काळात भाविक भक्तांना आरोग्य सुविधा,वीजपुरवठा, स्वच्छता, वाहतूक नियंत्रण,पाणीपुरवठा यांसारख्या मूलभूत सुविधा मिळाव्यात,यासाठी प्रशासनाने सर्वतोपरी तयारी केली असल्याची माहिती तहसीलदारांनी दिली.

# हदी भाषा भारतीय एकात्मतेचे प्रतीक -. डॉ.न पु काळे

पाटोदा /प्रतिनिधी

भारतीय भाषांमध्ये हिंदी ही एक राजभाषा म्हणून संविधानामध्ये नोंदवली गेली आहे. जगाच्या पाठीवर तिसऱ्या क्रमांकावर बोलल्या जाणाऱ्या हिंदी भाषेचा गौरव दिन म्हणून १४ सप्टेंबर आपल्याकडे हिंदी दिवस म्हणून साजरा केला जातो. देश विदेशात आता हिंदी भाषिक मोठ्या प्रमाणात आढळत आहेत. नामवंत हिंदी साहित्यिकांनी मोठ्या प्रमाणावर हिंदी मध्ये लेखन केले आहे. हिंदी भाषा ही भारतीय एकात्मतेचे प्रतीक आहे. असे प्रतिपादन व्ही पी महाविद्यालय, पाटोदा येथील हिंदी विभाग प्रमुख डॉ.न पु काळे यांनी केले.जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ, गेवराई संचलित कला व विज्ञान महाविद्यालय, पाटोदा येथे हिंदी




दिनाच्या निमित्ताने प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. काळे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा सोमनाथ घाडगे होते. यावेळी अध्यक्ष स्थानावरून ते म्हणाले, आपण सगळ्याच भाषेचा सन्मान केला पाहिजे. आपली भाषा, संस्कृती, रीती - रिवाज याचा प्रत्येकाला गर्व असायला हवा. आम्हाला मराठी, हिंदी, इंग्रजी भाषा आली पाहीजे त्यातून विद्यार्थ्यांचा भाषिक विकास होण्यास खूप मदत होते आहे. समाजात सामाजिक अभिसरणाचे काम भाषा करत असते. भाषे मुळे समाज एक संघ राहतो.

हिंदी दिनाच्या निमित्ताने विचारपीठावर हिंदी विभाग प्रमुख डॉ वंदन जाधव समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ सुनील जाधव अंतर्गत गूणवंता हमीं कक्षा चे इंग्रजी विभाग प्रमुख प्रा विनोद किर्दक यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा कीर्दक विद्यार्थ्याना मार्गदर्शन करताना म्हणाले की भाषेला सौंदर्य असते कोणत्या ही भाषे च्या प्रति कठोरता नसावी चांगला माणुस बनण्या साठी आपला संवाद चांगला राहणे आवश्यक आहे संभाषण जीवनाचा अविभाज्य घटक आहे या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.शेख खैसर यांनी केले. यावेळी कु औटे पुजा कु भक्ति कोल्हे यानी बनवलेल्या युवा स्पंदन भितीपत्रकाच पाहुण्याच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. सूत्रसंचालन कु वारभुवन आणि धरती मस्के यांनी केले व आभार हि विभाग प्रमुख डॉ वंदन जाधव यांनी मानले.

# मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या कै. दत्तासाहेब देशमुख विद्यालयात मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा

घनसावंगी /प्रतिनिधी

मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या कै.दत्तासाहेब देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,घनसावंगी येथे आज दि.१७ सप्टेंबर २०२५ रोजी मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे ध्वजारोहण घनसावंगी येथील प्रतिष्ठित व्यापारी आणि कर्मयोगी अंकुशराव टोपे साहेबांचे जवळचे सहकारी श्री. जमील बाबा सौदागर यांच्या हस्ते संपन्न झाले.त्यानंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते स्वातंत्र्यलढ्यातील महान नेत्यांना अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमास मोठ्या संख्येने मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली. त्यामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून

माजी नगराध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस श्री. नंदकुमार देशमुख,पंचायत समितीचे माजी उपसभापती श्री. प्रभाकर धाईत,माजी नगरसेवक ड.राजेश्वर देशमुख,नगराध्यक्ष श्री.पांडुरंग काथले,उपनगराध्यक्ष मुमताज भाई,नगरसेवक श्री. प्रल्हाद नाईक,बबनराव साळवे, माजी सरपंच,प्रतिष्ठित व्यापारी श्री.अंकुश मामा पवार व मोती सेठ जैन,माजी उपनगराध्यक्ष श्री.नवाब भाई,शासकीय गुत्तेदार श्री.नियाज महमद,पत्रकार,नरेंद्र जोगड, हनुमंत खोसे (झ-)

समाजसेवक सय्यद अहमद भाई,शेख नाजिम शेख अमीर, अफसर भाई,जब्बार शहा, स्वप्नील भाकरे,सोमनाथ साळवे, आसाराम धाईत यांसह सर्व युनिट प्रमुख मुख्याध्यापक केशव अटकर मुख्याध्यापक रंगनाथ पाटोळे,मुख्याध्यापक अब्दुल रज्जाक,मुख्याध्यापक रामप्रसाद गोरे,यांची विशेष उपस्थिती होती.

विद्यार्थी, शिक्षक व पालकांचा सहभाग या कार्यक्रमाला विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर घोषणा देत परिसर दुमदुमवला. मान्यवरांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाचे ऐतिहासिक महत्त्व अधोरेखित केले आणि विद्यार्थ्यांनी या संग्रामातून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य करण्याचे आवाहन केले.

# अतिवृष्टीमुळे पिकांचे प्रचंड नुकसान; शेतकऱ्यांच्या मदतीसाठी मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करणार आ.बबनराव लोणीकर

जालना /प्रतिनिधी

गेल्या दहा-बारा दिवसांपासून कोसळणाऱ्या सततच्या अतिवृष्टीमुळे परतूर-मंठा विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांचे सोयाबीन,कपाशी, मका,उडीद,मूग,तूर,पालेभाज्या आणि फळबागांसह अनेक पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे.या पार्श्वभूमीवर माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांची व्यथा जाणून घेतली.आमदार लोणीकर यांनी सांगितले की शेतकऱ्यांनी कर्ज काढून घरातील किडूक मिडूक विकून शेती केली होती. हाता-तोंडाशी आलेला घास निसर्ग हिरावून घेत आहे. मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन शेतकऱ्यांना तातडीची मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार आहे.१९ सप्टेंबर रोजी आमदार लोणीकर यांनी मंठा तालुक्यातील देवठाणा, मंठा, हेलस,पांगरी बु.दहिफळ, खंदारे, दहा तांडा,जयपूर,लावणी आदी गावांना भेटी देऊन शेतकऱ्यांची स्थिती पाहणी



केली.उभ्या पिकांवर पावसामुळे आलेले संकट,पाण्याखाली गेलेली शेते आणि पिवळी पडलेली पिके पाहून त्यांनी शेतकऱ्यांची व्यथा ऐकली.ते म्हणाले गेल्या ३५ वर्षांपासून मी शेतकऱ्यांसाठी कार्यरत आहे.आमदार म्हणून मी सदैव शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे. झालेल्या नुकसानीसाठी मदत मिळविण्यासाठी मी संपूर्ण ताकदीने प्रयत्न करणार आहे.

आमदार लोणीकर पुढे म्हणाले की बी-बियाणे,खते,औषधे यासाठी बँका व सावकारी कर्ज काढून पेरणी केली होती. सुरुवातीला हवामान अनुकूल असल्याने पिके चांगली जोमात होती. मात्र गेल्या दहा-बारा दिवसांत झालेल्या सततच्या पावसामुळे उभी पिके उध्वस्त झाली. ही शेतकऱ्यांसाठी अतिशय वेदनादायी वेळ आहे. या संकटातून शेतकऱ्यांना उभारी मिळावी यासाठी सरकारकडून मदत मिळवून देण्यासाठी मी ठाम प्रयत्नशील आहे.

या शेतकरी दौऱ्यात संदीप गोरे, गणेशराव खवणे,तालुकाध्यक्ष नितीन राठोड,पंजाबराव बोराडे, नागेश घारे,राजेश मोरे,कैलास बोराडे,अजय आवचार, आनंद जाधव,विलास घोडके,अमोल मोरे, माऊली गोंडगे, नाथराव काकडे,नितीन सरकटे,अशोक राठोड,मनोज देशमुख,राजेभाऊ खराबे,वसंत बागल,नामदेव बनसोडे,शरद मोरे,सुदाम काकडे,समाधान शिंदे, शंकरराव मोरे, सुभाष देशमुख,प्रवीण वायाळ,मुकुंद वायाळ,उमेश वायाळ,श्याम वाकळे,व्यंकट हिवाळे,सोमेश्वर वायाळ,राहुल राठोड,पवन खंदारे,वैभव देशमुख,रंजीत राठोड,प्रशांत राठोड, प्रसाद सदावर्ते, रामेश्वर राठोड,प्रभाकर जाधव,माऊली जाधव,सुरेश काळे,काशिनाथ जाधव,

# अंबड तालुक्यातील रुई गावातील पाझर तलाव फुटला!

शेतकऱ्यांचे स्वप्न चुरसले; प्रशासनाच्या अनास्थेमुळे मोठे संकट

अंबड /प्रतिनिधी

तालुक्यातील रुई गावात प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे आणि जलसंधारण विभागाच्या भोंगळ कारभारामुळे पाझर तलाव क्र.-२ फुटून शेतकऱ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे.पूर्वसूचना देऊनही प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा फटका अखेर शेतकऱ्यांना बसला असून खरीप हंगामाच्या सुरुवातीलाच त्यांच्या डोळ्यातील पिकांच्या आशा-स्वप्नांचा चुराडा झाला आहे.गावातील शेतकऱ्यांनी १७ जुलै २०२५ रोजी जलसंधारण विभागाला लेखी अर्जाद्वारे



तलावाला पडलेल्या भेगांची माहिती दिली होती. तलाव कधीही फुटू शकतो असा स्पष्ट इशाराही त्यांनी दिला होता.मात्र, प्रशासनाने या गंभीर तक्रारीकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले.

जर वेळीच उपाययोजना करण्यात आल्या असत्या तर आजचे संकट टळले असते, अशी तीव्र भावना शेतकरी व्यक्त करत आहेत.दि.१९ सप्टेंबर रोजी सकाळी अचानक तलाव फुटल्याने लाखो लिटर पाणी वेगाने शेतात घुसले. काही मिनिटांतच शेकडो एकरांवरील उभी पिके पाण्याखाली गेली. शेतजमिनी खरडून गेल्या असून, खरीप हंगामाच्या सुरुवातीला आलेल्या या आपत्तीने शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे.

शेतकरी हवालदिल झाले असून आमच्या स्वप्नांचा चिखल झाला आहे अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या.या घटनेमुळे शेतकरी वर्गात प्रचंड संताप उसळला आहे.त्यांनी प्रशासनावर निष्क्रियतेचे आरोप करत तातडीने नुकसानग्रस्त शेतजमिनी व पिकांचे पंचनामे करावेत योग्य व न्याय्य भरपाई द्यावी,निष्काळजी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी,अशा ठाम मागण्या केल्या आहेत.

शेतकऱ्यांचा आक्रोश आणि संताप प्रशासनापर्यंत पोहोचला असून, या प्रकरणात जबाबदाऱ्या निश्चित करून कारवाई केली जाणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

तलाव फुटण्याच्या या घटनेने केवळ रुई गावच नव्हे तर संपूर्ण अंबड तालुक्यात प्रशासनावरील विश्वास डळमळीत झाला आहे.




# काळवटी तांडा ग्रामपंचायत सरपंचपदी जयश्रीताई राठोड यांची बिनविरोध निवड

शरदभाऊ राठोड यांच्या वतीने नुतन सरपंचाचा सत्कार

अंबाजोगाई /प्रतिनिधी

काळवटी तांडा ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी जयश्रीताई फुलचंद राठोड यांची बिनविरोध निवड होऊन गावच्या नेतृत्वाचा सुकाणू महिला शक्तीच्या हाती देण्यात आला आहे. या निवडीमुळे ग्रामविकासाच्या नव्या पर्वाला प्रारंभ होईल, अशी ग्रामस्थांची अपेक्षा आहे.

या प्रसंगी अखिल भारतीय बंजारा क्रांती दलाचे राष्ट्रीय महासचिव तथा भाजपा ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष शरदभाऊ राठोड यांच्या वतीने जयश्रीताईंचा सत्कार करून त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करण्यात आले.मागील अनेक वर्षांपासून काळवटी तांडा ग्रामपंचायत ही भारतीय जनता पार्टीच्या ताब्यात असून, शासनाच्या विविध योजनांमधून शरदभाऊ राठोड यांनी या भागाचा लक्षणीय कायापालट घडवून आणला आहे.ग्रामपंचायतीच्या कार्यकाळात गावच्या सर्वांगीण विकासावरच भर राहील, असा ठाम विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

महायुती सरकारच्या माध्यमातून तसेच ग्रामस्थांच्या सहकार्यातून या गावाचा चेहरामोहरा बदलल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही, अशा निर्धारपूर्ण शब्दांत शरदभाऊ राठोड यांनी ग्रामविकासाचा संकल्प उलगडून दाखविला.जयश्रीताईंच्या निवडीमुळे गावात उत्साहाचे वातावरण असून, विकासाचा वेग आणखी वाढेल

# देगलूर नगर परिषदेचा राज्यस्तरीय सन्मान : '१०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा 'विशेष मोहीमेत' तिसरा क्रमांक

देगलूर /प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या १०० दिवसांची कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीमेत देगलूर नगर परिषदेला राज्यस्तरीय यश प्राप्त झाले आहे. राज्य, विभाग, जिल्हा व तालुका स्तरावरील तब्बल १२ हजार ५०० शासकीय कार्यालयांमध्ये शहराच्या नगर परिषदेने आपले वेगळेपण सिद्ध करत छत्रपती संभाजीनगर विभागातून तिसरा क्रमांक पटकावला आहे. या यशामुळे देगलूर शहराचा मान उंचावला असून नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

नगरपरिषदेचे मुख्याधिकारी मीनल कांबळे यांनी कार्यकाळात , पारदर्शक कारभार व शिस्तबद्ध प्रशासनामुळे हा



सन्मान मिळविण्यात यश आले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्या स्वाक्षरीने गौरवपत्र प्रदान करण्यात आले आहे. यामुळे देगलूर नगर परिषद आदर्श कार्यालय म्हणून ओळख निर्माण करण्यात यशस्वी ठरली आहे.

नागरिकांना वेळेवर व पारदर्शक सेवा, शिस्तबद्ध कामकाज आणि प्रामाणिक प्रशासनाची दखल राज्य शासनाने घेतली आहे. या पार्श्वभूमीवर नगर परिषदेच्या कार्याला आणखी चालना मिळेल, असा विश्वास स्थानिक नागरिक व जनप्रतिनिधींनी व्यक्त केला आहे. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी ही कामगिरी प्रेरणादायी ठरणार असल्याचे मत मांडले जात आहे.

हा सन्मान नांदेड जिल्ह्याच्या पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, निवासी जिल्हाधिकारी वडदकर यांच्या उपस्थितीत देगलूर नगरपरिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल कांबळे, स्वच्छता निरीक्षक गौरवकुमार उत्तमराव जाधव, कुणाल उनग्रतवार यांना प्रदान करण्यात आला

# किशोरवयीन मुलांनी वाढत्या वयासोबत आरोग्य जपावे - धनराज पवार

अंबाजोगाई /प्रतिनिधी

इंटेन्सिफाइड आयसी कॅम्पियन अंतर्गत मानवलोक समाजकार्य महाविद्यालय, आंबाजोगाई येथील अजीवन शिक्षण व विस्तार सेवा केंद्र व तसेच स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, आंबाजोगाई यांच्या संयुक्त विद्यमाने जयप्रभा माध्यमिक विद्यालय कुंबेफळ येथे दिनांक १९ सप्टेंबर २०२५ रोजी किशोरवयीन मुलांसाठी एचआयव्ही विषयी समज व गैरसमज आणि आरोग्य जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात घेण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्री धनराज पवार, डॉ. हनुमंत साळुंके, श्री सुनील घुगे, श्री बन्सी पवार हे उपस्थित होते.या कार्यक्रमामध्ये प्रमुख मार्गदर्शक श्री. धनराज पवार यांनी



मार्गदर्शन करताना सांगितले की, किशोरावस्था ही वाढत्या वयातील संवेदनशील अवस्था असून या काळात शारीरिक, मानसिक आणि भावनिक बदल मोठ्या प्रमाणावर होत असतात. त्यामुळे या वयात आरोग्य जपणे अत्यंत आवश्यक आहे. योग्य आहार, व्यायाम, स्वच्छता आणि आरोग्यविषयक सवयी अंगीकारल्यास भविष्यातील आजारांपासून संरक्षण मिळते.संतुलित आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप व स्वच्छता या गोष्टी मुलांनी अंगीकारल्या पाहिजेत. मोबाईलचा अतिरेक, व्यसनाधीनता, चुकीच्या सवयी व ताणतणाव हे किशोरवयीन वयातील प्रमुख आरोग्य धोके आहेत.

अध्यक्षीय समारोप बन्सी पवार सर यांनी विद्यार्थ्यांना चांगले आरोग्य राहण्यासाठी आपण सत्कार्य केले पाहिजे आणि आपण जोडीदार निवडत असताना दोघांचीही एचआयव्ही तपासणी करून घेणे काळाची गरज आहे असे मत व्यक्त केले.प्रस्ताविक डॉ. साळुंखे सरांनी केले.या प्रसंगी शाळेचे शिक्षक वर्ग कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शितल पाईकराव व आभारप्रदर्शन गजानन गायकवाड यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संध्या फड, नितीन गोरे पल्लवी काळे ,श्रद्धा काकडे व शाळेतील शिक्षक व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले शेवटी विद्यार्थ्यांना लग्नअगोदर एचआयव्ही व आरोग्य विषयक वेगवेगळ्या चाचणी करण्यासंदर्भात प्रतिज्ञा

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# आम्हा आंदोलकांना बीड रेल्वे सुरू झाल्याचा परमोच्च आनंद - अँड.चंद्रकांत नवले

बीड /प्रतिनिधी

सन १९८५ ला सुरेश आण्णा नवले यांचे नेतृत्वाखाली बलभीम महाविद्यालय, श्री. बंकटस्वामी महाविद्यालय, नवगण कॉलेज आणि इतर महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी संसदा आमच्या ताब्यात असताना आणि साहेब स्वतः बलभीम महाविद्यालयाचे विद्यार्थी संसदेचे अध्यक्ष असताना त्या काळापासून बीडला रेल्वे सुरू व्हावी म्हणून आंदोलन पुकारले होते.त्यामध्ये सक्रिय सहभाग नोंदवला होता. तदनंतर रेल्वे कृती समिती तर्फे वेळोवेळी झालेल्या आंदोलनामध्ये सर्व महाविद्यालयीन विद्यार्थी, विद्यार्थिनींना सोबत घेऊन अनेक वेळा प्रखर आंदोलने केली

मा. आ. श्री .राजेंद्रजी जगताप साहेब यांच्या नेतृत्वाखाली रेल्वे कृती समितीमध्ये आंदोलन केले. जेलमध्ये सुद्धा जावे लागले. त्यानंतर १९९६-९७ मध्ये स्व. ना. गोपीनाथराव मुंडे साहेब, खा. रजनीताई पाटील यांनी तत्कालीन रेल्वेमंत्री ना. रामविलास पासवान साहेब यांच्या उपस्थितीत बीडला रेल्वे परिषदेचे आणि सभेचे आयोजन चंपावती मैदानावर केले होते. त्यावेळी हजारो महिला पुरुष आणि आंदोलकांच्या उपस्थितीमध्ये रेल्वे स्थानकाचे भूमिपूजन केले होते. त्यावेळेस साहेबांचा बेस्ट बसणे अपघात झाल्यामुळे ते कार्यक्रमाला उपस्थित राहू शकले नाहीत. म्हणून सबंध शिवसैनिक आणि कार्यकर्त्यांच्या वतीने मी शिवसेनेचा जिल्हाप्रमुख म्हणून कार्यक्रमाचा प्रमुख अतिथी होतो. त्यावेळेस मी माझ्या भाषणामध्ये रेल्वेसाठी विद्यार्थ्यांनी, कामगारांनी, शेतकऱ्यांनी, शेतमजुरांनी, व्यापाऱ्यांनी डावे-उजव्या कम्युनिस्ट पक्षांनी, शिवसेना, भाजपा पक्षांनी कसे आंदोलने केले.याचा ३५ मिनिटांचा भाषणामध्ये विस्तृतपणे मांडले होते. त्यावेळेस जनतेतून प्रचंड टाळ्या वाजवून सर्वांचा प्रतिसाद मिळाला होता.

त्यानंतर सुद्धा रेल्वे आंदोलनामध्ये आम्ही सर्वजण सहभागी होतो. त्यावेळी शिवसेना व भारतीय विद्यार्थी सेनेच्या वतीने सुद्धा वेळोवेळी आंदोलने करण्यात आली.

२००८ मध्ये नवले साहेब यांची विधान परिषदेवर निवड झाल्यानंतर साहेबांनी महाराष्ट्राच्या विधान परिषदेमध्ये लक्षवेधी मांडून, तारांकित प्रश्न उपस्थित करून महाराष्ट्र शासनाने व केंद्र शासनाने अर्धा-अर्धा वाटा उचलावा आणि हा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी केली होती. तोच धागा पकडून महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख साहेब यांनी या मागणीला पाठिंबा दिला आणि त्याप्रमाणे प्रस्ताव केंद्राकडे दाखल करून या प्रस्तावाला मंजुरी दिली.याप्रमाणे शिवसेनेने रेल्वे मंजुरीसाठी मागणी, आंदोलने आणि पाठपुरावा करून सक्रिय सहभाग नोंदवलेला आहे यामध्ये स्व. अमोल भैया गलधर, शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख रावसाहेब गुजर, माजी जिल्हाप्रमुख विजय अण्णा बहिर, माजी जिल्हाप्रमुख किशोर उबाळे, माजी पर्यटन संचालक श्री. दिलीप भाऊ धूत, अनिलजी घुमरे, तत्कालीन शेतकरी सेनेचे प्रमुख प्रभाकर आप्पा कोलगडे, शिवसेनेचे नगरसेवक सुधिरजी थीगळे, स्व. पुष्पाताई मनुरकर, वसंतरावजी थिगळे, किशोर काळे, शिवसेनेचे जिल्हा संघटक शशिकांतरावजी जाधव, माजी उपनगराध्यक्ष कै. वसंतराव जाधव, कै. किसनराव जाधव, माजी शहरप्रमुख संजय नलावडे, शहाजी गायकवाड,श्री बाळासाहेब पिंगळे, जयसिंग मामा चुंगडे, श्री मारोतीराव दिपाले, श्री. लक्ष्मण दादा ढवळे, राजेंद्र ढवळे, स्व. शिवाजी आबा नवले, बबन जिजा जगताप, स्व. बाळासाहेब शामराव गायकवाड पूनम गल्ली, दत्त सुदामराव गायकवाड, अनिलजी ढेपे, नंदू येवले, संपतराव वरवट, स्व. गोकुळ फरताळे, चेअरमन रामेश्वर कुंभारकर, शिवाजीराव मोरे, सुनीलजी महाकुंडे, स्व. संजय महाकुंडे, आसारामजी गलधर, भाऊसाहेब गलधर, गणेश गरुड, शिवाजीराव नवले पाली, आसारामजी आमटे, येळे बापू, भगवान सेनेचे जिल्हाध्यक्ष मुरलीधरराव ढाकणे, सरसेनापती फुलचंदरावजी कराड, विठ्ठलरावजी दंडे, माजी तालुकाप्रमुख श्री. शिंदे साहेब, माजी तालुकाप्रमुख विनायक ढगे, केजचे माजी तालुकाप्रमुख किसनराव कदम, माजी तालुकाप्रमुख श्री. राजाभाऊ जाधव, माजी शहर प्रमुख श्री. संजय शिंदे, केजचे माजी तालुकाप्रमुख किसनराव कदम, माजी तालुकाप्रमुख राजेभाऊ जाधव, माजी शहर प्रमुख श्री. संजय शिंदे, हनुमंतराव नारायनकर पाटोदा, सुशीलभाऊ कोठेकर, माजी तालुकाप्रमुख वैजनाथ दादा येवले, सुभाषरावजी घाडगे, जालिंदररावजी पिसाळ, माजी तालुकाप्रमुख नारायण



होंडे साहेब, कै. वैजनाथदादा येवले, सुभाषजी घाडगे, श्री. चाळक साहेब गेवराई, सखारामजी हकदार, माजी जि. प. सदस्य दशरथ दादा वनवे, वैजनाथ मिसाळ, कै. प्रल्हादराव पालवे, सर्जेराव तात्या तांदळे, विकास साळुंके, विश्वनाथराव पोटे, कैलासराव नलावडे सरपंच, पिंटूशेठ पिंगळे, त्रिंबकराव आबदार, बापू सवासे, श्री. शेषेराव आरेकर, श्री. वशिष्ठ नवले जि प सदस्य, बाळासाहेब काळे, सतीशजी महाजन, शिरीषजी महाजन, प्रभाकर जाधव, भारत भाऊ गायकवाड, स्व. भागवतराव पुजारी, अशोकजी तावरे,कृष्णा वांगीकर, स्व. सुमंत रुईकर, बिबीशन चव्हाण, रोहिदास कदम, स्व. शेषराव बहिरवाळ, गणेश बनसोडे, परमेश्वर डोंगर, तात्या शिंदे, बाबा भिंगले, चंद्रसेन उबाळे पाटील, प्रल्हादराव धनगुडे पाटील, श्रीरामजी ढवळे, अशोक भैय्या रोमन, स्व. अशोक मस्कर, श्रीकांतराव अंगदराव पवळ, बाळासाहेब घुमरे पाटील, संजय महाद्वार, रंजीत भाऊ कदम, नगरसेवक रामसिंग टाक, कै. प्रतापराव लाहोट कै. मारुतीराव गायकवाड, मुरलीधरराव राऊत, दामोदरराव राऊत, अनिलजी भागवत, पारसजी ओस्तवाल महिला आघाडी प्रमुख कुसुमताई पवार, श्रीमती शैलेजाताई खडकीकर, शहादेव खांडे, शहादेव बापू घोडके, माऊली खांडे, श्रीधरराव उखांडे पाटील, हनुमानराव जगताप, श्रीराम जगताप, लक्ष्मणराव काटे, श्रीमंतराव उबाळे, अभिमान पडूळे, वसंतराव पडूळे, मिर्झा चौकत बेग, सिराज पठाण, मशरू पठाण, सय्यद सलीम सय्यद अमीर, श्री. शाफेभाई ,शेख मज्जुभाई (माजेद), संभाजीराव भोसले, विजयकुमार धांडे, गोपाळराव धांडे, पोपटराव शिंदे स्व.बाबासाहेब पिंगळे पाटील, मोहनराव पिंगळे पाटील, रवींद्रजी जवेरी साहेब, स्वर्गीय भागवतराव कोठेकर, अर्जुन राव बहिरवाळ, मुक्तारामजी आहेर, भगवानराव आहेर पाटील, दिलीपराव आहेर पाटील, प्रतापराव नवले, श्री. राजेंद्र गुप्ते रामेश्वर चांदणे सर स्व. आत्माराम चांदणे साहेब, भास्कर चांदणे बळी जिजाऊ चव्हाण, माजी नगरसेवक पांडुरंगजी गायकवाड पुनम गल्ली, श्री. प्रतापराव गायकवाड, योगेश गायकवाड, श्री दयानंद गायकवाड, ड. सचिन गायकवाड, प्रभाकर उद्धवराव जाधव( पोलिस पाटील), भरत पांडुरंग जाधव (शिवसेना जिल्हा सरचिटणीस), सुनिल आबासाहेब जाधव, कैलास जाधव, (माजी सरपंच) पाटील रामभाऊ जाधव.संतोष कदम परळी येथील श्री. पप्पूजी ठक्कर, नगरसेवक सोहनी, माजी शहरप्रमुख नागनाथ पवार, अतुलजी दुबे सर, माजी नगरसेवक भाऊराव भोईटे, नगरसेवक श्रीरामजी लाखे, अरुण सावंत धारूर कोणत्या राजेंद्र सोनी, मदनलाल परदेशी आंबेजोगाई, उद्धव वाघमारे, बाळासाहेब देशमुख, श्रीरंग जाधव पाटोदा, आप्पासाहेब पोखरकरनागनाथ पवार, अभय कुमार ठक्कर, भाऊराव भोईटे, माजी उपजिल्हाप्रमुख सुरेश टाक, वैजनाथ साळुंखे, माजी तालुकाप्रमुख बाजीराव शिंदे, विठ्ठल दंडे, जगन्नाथ सोळुंके, भोजराज पालीवाल, कै. दिलीप शेठ बद्दर, रवींद्र परदेशी, चन्बसआप्पा गिरवालकर, रमेश भाऊ चोंडे, रमेश रेड्डी, राजेंद्र सोनी नागनाथ पवार इंगळे, स्व. सुभाषजी शेळके खांबा लिंबा, माजी तालुकाप्रमुख सुनीलजी सोनवणे, स्व. दत्ता काशीद. बापू काशीद, स्व. भीमा क्षीरसागर, अशोकराव नवले टेलर, श्रीमंतराव नलावडे, शरद आदिनाथराव नवले, मा. आ. श्री. आदिनाथराव नवले, मा. आ.श्री. राजेंद्रजी जगताप, मा. आ. जनार्दन तुपे, मा.आ. शिरजभाई देशमुख, मोहनराव जगताप, मा.आ. बाजीरावजी जगताप, माजी नगरसेवक कै. सखारामजी काळे, ज्ञानेश्वर मेंडके, विठ्ठल भाऊ लगड, विठ्ठलभाऊ शिंदे, यांचेसह हजारो हजारो कार्यकर्ते आणि बीड मधील धांडे गल्ली, कबाड गल्ली, माळवेस, धोंडीपुरा, पेठ बीड, पूनम गल्ली सह शहरातील आणि ग्रामीण भागातील सर्व तरुणांनी, शेतकऱ्यांनी यामध्ये प्रचंड मेहनत घेऊन घाम गाळून रक्ताचे पाणी करून आंदोलने केलेले आहेत आणि म्हणूनच आज कुठेतरी त्याचे फळ आपल्याला दिसत आहे.

बीडला रेल्वे आली याचा आम्हाला मनस्वी आनंद झालेला असून याचे आम्हाला श्रेय नकोच.

हा इतिहास सर्वांना ज्ञात आहेच परंतु या आठवणींना उजाळा द्यावासा वाटला म्हणून ही माझी पोस्ट आहे.




## पंचनाम्याचे गुऱ्हाळ बंद करा व शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी पन्नास हजार रुपये नुकसान भरपाई द्या - गणेश बजगुडे पाटील

बीड / बीड तालुक्यासह जिल्हाभरात परतीच्या पावसाने प्रचंड धुमाकूळ घातलेला असुन शेतमालासह शेतीचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. अतिशय कष्टाने उभारलेली खरिपाची सर्वच्या सर्व पिके तर गेलीच परंतु माती देखील मोठ्या प्रमाणात वाहुन गेल्यामुळे शेतमालासह शेतीचे देखील मोठे नुकसान झालेले आहे. शेतकऱ्याच्या पिकाला हमी भाव नाही, कर्जमाफी नाही, पिक विमा देखील मिळत नाही यामुळे आधीच हवालदिल असलेला शेतकरी पुन्हा अतिवृष्टीमुळे हातातोंडाला आलेले पीक वाहुन गेले यामुळे शेतकरी बांधव प्रचंड त्रस्त असुन बीड तालुक्यातील सर्वच्या सर्व मंडळात अतिवृष्टीमुळे प्रचंड नुकसान झालेले असताना प्रशासन आणि शासन पंचनाम्याच्या नावावर वेळ काढूपण! करत असुन मायबाप सरकारने पंचनाम्याचे गुऱ्हाळ बंद करून सर्व शेतकऱ्यांना तत्काळ सरसकट हेक्टरी किमान ५० हजार नुकसान भरपाई द्यावी जर आठ दिवसाच्या आत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई नाही मिळाली तर बीड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने आंदोलन करण्यात येईल असे बीड तालुका काँग्रेसचे अध्यक्ष गणेश दादा बजगुडे पाटील यांनी तहसीलदार बीड यांना दिलेल्या निवेदनात सांगितले आहे यानिवेदनावर गणेश राऊत, रामधन जमाले, ड. अक्षय मुळे, शिवराज क्षीरसट, अविनाश डरपे, आदी पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## बौद्ध महासभेचा बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर आक्रोश मोर्चा संपन्न

आष्टी (प्रतिनिधी)

महाविहार महाबोधी दिक्षाभूमी मुक्तीसाठी बौद्ध महासभेच्या वतीने बीडचे जिल्हाधिकारी कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला होता. या मोर्चामध्ये मोठ्या संख्येने दिक्षाभूमी मुक्तीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर अनुयायांची उपस्थिती होती. हा मोर्चा डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून काढण्यात आला होता. सकाळी भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला. या मोर्चाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापासून सुरूवात करण्यात आली होती. या मोर्चामध्ये अनेक अनुयायांची उपस्थिती होती. मागणीचे निवेदन जिल्हाधिकारी यांना देण्यात आले. भारतीय बौद्ध महासभेचा बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर जन आक्रोश मोर्चा भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रिय कार्याध्यक्ष तथा समता सैनिक दल राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. भीमराव यशवंतराव यांच्या आदेशानुसार १७ सप्टेंबर २०२५ ऐवजी पोलिस प्रशासनाच्या अडचणीमुळे दि. १८ सप्टेंबर रोजी बीड जिल्हा शाखेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक मोर्चा काढण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष महालिंग निकाळजे व महिला जिल्हाध्यक्षा अरुणा निसर्गण यांनी हार अर्पण केला. पूज्य भंते पय्यातीस यांनी त्रिसरण पंचशील घेतले. महाराष्ट्र राज्य शाखेचे संरक्षण सचिव अमरसिंह ढाका व जिल्हा संरक्षण उपाध्यक्ष कॅ. राजाभाऊ आठवले आणि सर्व समता सैनिकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास सलामी दिली आणि मोर्चास प्रारंभ झाला. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, चौक छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर दुपारी मोर्चा धडकला. जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनामध्ये प्रमुख तीन मागण्या करण्यात आल्या. बोधिगया महाबोधी विहार ब्राह्मण पुजाऱ्याच्या ताब्यातून काढून बौद्धांच्या ताब्यात देण्यात यावे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे महू येथील जन्मस्थळी असलेले स्मारक भारतीय बौद्ध महासभेचे ताब्यात देण्यात यावे, नागपूर येथील दीक्षाभूमी भारतीय बौद्ध महासभेच्या ताब्यात व्यवस्थापणेसाठी देण्यात यावे या प्रमुख मागण्यांचे निवेदन बीडचे जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्री बिहार सरकार, मा. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री महाराष्ट्र सरकार, मा. मुख्यमंत्री मध्यप्रदेश सरकार यांना देण्यात आले.या निवेदनाच्या प्रतिलिपी राष्ट्रपती भारत सरकार, मा. प्रधानमंत्री भारत सरकार व दी बुद्धिस्त सोसायटी ऑफ इंडिया, केंद्रीय कार्यालय मुंबई यांना ईमेल पाठविण्यात आले. या मोर्चात विभागीय संघटक डी. एस. नरसिंगे, भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष महालिंग निकाळजे, वंचित बहुजन महासंघाचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे व पदाधिकारी, महिला अध्यक्षा अरुणा निसर्गण व महिला पदाधिकारी, इंजिनीयर कांचन गायकवाड, ड. अविनाश गंडले, भारतीय बौद्ध महासभेचे सरचिटणीस सिद्धार्थ जगझाप, कोषाध्यक्ष अमरसिंह ढाका, उपाध्यक्ष वामनराव निकाळजे, उपाध्यक्ष ड. हनुमंत कांबळे, उपाध्यक्ष कॅ. राजाभाऊ आठवले, बीड तालुकाध्यक्ष राजेंद्र ससाणे, आष्टी तालुकाध्यक्ष रत्नकांत निकाळजे, पाटोदा तालुकाध्यक्ष भगवान जावळे, शिरूर तालुकाध्यक्ष बाळासाहेब बोराडे, गेवराई तालुकाध्यक्ष अनिल बोराडे व पदाधिकारी सर्व तालुक्यातील समता सैनिक दल, गौतम सोनवणे, सोनाजी शिंदे, अनिल डोळस, शिवाजी वावळकर, पद्मिनीताई गायकवाड, सिद्धार्थ गरुड, ड. तेजस वडमारे, बनसोडे सर, अजिनाथ खंडागळे आदी सर्व तालुक्यातील बहुसंख्येने धम्म उपासक, उपासिका उपस्थित होते.



# गावाकडच्या भूमिपुत्रांच्या कौतुक वर्षावाने पोलीस अधिकारी गहिवरतात तेव्हा

## पोलीस उपायुक्त बजरंग बनसोडे यांच्या पदकांचा मित्रांना अभिमान

आष्टी - (प्रतिनिधी) पोलीस विभागामध्ये कार्यरत असताना राष्ट्रीय पातळीवर प्रतिनियुक्तीवर असताना अत्यंत मौलिक कामगिरी केल्याबद्दल २०२४ मध्ये भारत सरकारचे केंद्रिय गृहमंत्री दक्षता पदक व २०२५ मध्ये राष्ट्रीय तपास यंत्रणा पोलीस महासंचालकांच्या रौप्यपदक प्रदान करून अनेक प्रशस्ती पत्रास पात्र ठरलेल्या आपल्या मित्राच्या अभिनंदनसाठी गेलेल्या आष्टी येथील पत्रकार बांधवांनाच्या शुभेच्छा वर्षावाने उच्चपदस्थ पोलीस अधिकारी अक्षरशः गहिवरून गेले!

त्याचे झाले असे की, मुंबई येथे पोलीस उपायुक्तपदी नियुक्तीवर असलेले आष्टी तालुक्यातील रुईनालकोलचे भूमिपुत्र बजरंग आनंदराव बनसोडे यांना नुकताच राष्ट्रीय तपास यंत्रणा महासंचालक यांच्याकडून विशेष कामगिरी बद्दल रौप्य पदक जाहीर करण्यात आले आहे. ही बाब



अष्टीकरांना विशेष अभिमानास्पद आणि आनंदाची झाली... आणि म्हणून आष्टी येथील त्यांचा वर्गमित्र रघुनाथ कर्डीले हे ११ पत्रकारांसह पोलीस उपायुक्त बजरंग बनसोडे यांच्या मुंबईतील कार्यालयात जाऊन उत्स्फूर्तपणे त्यांचे कौतुक, अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या. गावाकडच्या बालपणीच्या मित्र परिवारा कडून झालेले हे कौतुक अनुभवताना पोलीस विभागातील उच्च पदावर असलेल्या पोलीस उपायुक्त बजरंग बनसोडे यांना भावना अनावर झाल्या. अक्षरशः गहिवरून व आनंदुन त्यांनी या अत्यंत प्रेमाच्या शुभेच्छा स्वीकारल्या.... आणि एक तास गप्पांमध्ये मैफिल रंगली...

राष्ट्रीय तपास यंत्रणा नवी दिल्ली येथे कार्यरत असताना राष्ट्रीय सुरक्षा व ऐक्य अबाधित राखण्यासाठी केलेल्या विशेष कामगिरीबद्दल

भारत सरकार गृह विभागाने केंद्रीय गृहमंत्री दक्षता पथक २०२४ हा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला आहे. देशसेवा देशहिताला सर्वप्रथम प्राधान्य देणारी बजरंग बनसोडे यांची वृत्ती आहे. त्यांना कठीण काम सहज पूर्ण करण्यास मदत करते. याप्रसंगी तालुक्यातील महापूर, पिकांची हानी, नागरिकांचे हाल, पर्यावरण संरक्षण, पर्यावरण संरक्षण, नदी संरक्षण, संवर्धन या विषयावर त्यांनी उपयुक्त चर्चा केली. पर्यावरणाची जोपासना व पंचमहाभूतांचे महत्त्व ओळखून त्यांना जपणे आणि संवर्धन करणे हे मानवी कल्याणासाठी खूप आवश्यक आहे असेही यावेळी बनसोडे यांनी सांगितले.

विद्यार्थीदशेत बन्सोडे यांनी नवी मुंबई (पनवेल) येथे बस स्टॅन्डजवळ एका उसाच्या रसवंतीच्या दुकानावर कामगार (वेटर) म्हणून काम केले होते. त्याचवर्षी त्यांचा इयत्ता बारावीचा निकाल लागला आणि पुढील प्रगतीची वाटचाल सुरू झाली असेही त्यांनी यावेळी आवर्जून पत्रकारांशी बोलताना सांगितले. ग्रामीण भागातील मुलांना प्रामाणिक व कठोर परिश्रम आणि शिक्षण हाच एकमेव प्रगतीचा विकासाचा मार्ग आहे. विशेषता मराठवाड्यातील दुष्काळी भागात पर्यावरण व शिक्षण यावर भिस्त ठेवूनच प्रगती करणे शक्य असल्याचेही बन्सोडे यांनी सांगितले.

आष्टीचे भुमीपुत्र मुंबई पोलिस उपायुक्त बजरंग बनसोडे यांची मुंबई उझ कार्यालयात आष्टी तालुका पत्रकार संघाने भेट घेऊन शुभेच्छा दिल्या. पत्रकार रघुनाथ कर्डिले यांचे वर्गमित्र असल्याने सदिच्छा भेट घेऊन गावाकडच्या विविध विषयावर चर्चा करण्यात आली. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण पोकळे, उपाध्यक्ष संतोष सानप, झुंजारनेताचे उपसंपादक उत्तम

## घरकुलाच्या कागदपत्रासाठी लाच घेणारा ग्रामसेवक पकडला

बीड : पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घरकुलाच्या दुसऱ्या हप्त्यासाठी लागणारे बेबाकी प्रमाणपत्र देण्यासाठी लाच घेणारा ग्रामसेवक लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या सापळ्यात अडकला.

गंगाधर सुरेश ठोंबरे (वय ४४), ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक), ग्रामपंचायत कार्यालय केकत सारणी, ता. केज, जि. बीड, रा. सारणी सांगवी, ह.मु. भगवानबाबा चौक, एम.आय.टी. रोड, अंबाजोगाई, जि. बीड, यांनी घरकुलाच्या दुसऱ्या हप्त्यासाठी लागणाऱ्या बेबाकी प्रमाणपत्राच्या मोबदल्यात ५ हजार रुपयांची लाच मागितल्याची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे करण्यात आली होती.

तक्रारदार यांनी लाच देण्याची इच्छा नसल्याने १८ सप्टेंबर २०२५ रोजी बीड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक समाधान कवडे यांचेकडे लेखी तक्रार दाखल केली. प्राथमिक पडताळणीत ठोंबरे यांनी ५ हजार रुपयांच्या लाचेची मागणी केली असल्याचे स्पष्ट झाले. तडजोडीनंतर त्यांनी ४ हजार रुपये स्वीकारण्यास मान्यता दिली आणि पहिला हप्ता म्हणून २ हजार रुपये घेण्याचे मान्य केले.

या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने १८ सप्टेंबर रोजी पंचासमक्ष पडताळणी केली. त्यानंतर आज १९ सप्टेंबर २०२५ रोजी तक्रारदाराकडून पंचासमक्ष २ हजार रुपयांची लाच स्वीकारताना पंचायत समिती कार्यालय, केज परिसरात गंगाधर ठोंबरे यांना सापळा पथकाने रंगेहात पकडले.लाचेची रक्कम पंचासमक्ष जप्त करण्यात आली असून, ठोंबरे यांच्या विरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया केज पोलीस ठाण्यात सुरू आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीडच्या पथकाने कारवाई करत ग्रामसेवकाचा गैरप्रकार उघड केला.

# लिंबागणेश येथील गतिरोधक प्रकरणी ठिय्या आंदोलन

## आ. संदिप क्षीरसागर यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी संवाद साधत काम मार्गी लावण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन स्थगित :- डॉ. गणेश ढवळे

लिंबागणेश :-बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील अहमदपूर - अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्ग क्र. ५४८ डी वर भालचंद्र माध्यमिक विद्यालय व बसस्थानक परिसर हा अपघातप्रवण भाग असल्याने येथे गतिरोधक बसविण्याची मागणी डॉ. गणेश ढवळे व पत्रकार हरिओम क्षीरसागर यांनी वारंवार निवेदनांद्वारे व आंदोलनांद्वारे केली होती.

या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी बीड श्री. विवेक जॉन्सन यांच्या आदेशानुसार दि.२६ जून रोजी अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, रस्ता सुरक्षा समितीचे सचिव तथा मुख्य कार्यकारी अभियंता रवींद्र तोंडे, तसेच वाहतूक शाखेचे प्रमुख सुभाष सानप यांनी घटनास्थळी पाहणी केली होती. यावेळी सूचनाफलक लावण्याच्या सूचना कंत्राटदार व महामार्ग अधिकाऱ्यांना देण्यात आल्या होत्या. मात्र पाहणीस तीन महिने उलटूनही प्रत्यक्ष काम सुरू न झाल्याने ग्रामपंचायत कार्यालयासमोर आज (दि.१९ सप्टेंबर) ठिय्या आंदोलन छेडण्यात आले.

आमदार संदिप क्षीरसागरांची आंदोलनस्थळी उपस्थिती

दरम्यान, बीड विधानसभा मतदारसंघाचे




आमदार संदिप क्षीरसागर हे अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची पाहणी करण्यासाठी तालुक्यात आले असता त्यांनी आंदोलनस्थळी भेट देत आंदोलनकर्त्यांची व्यथा ऐकली. त्यांनी तत्काळ जिल्हाधिकारी व कार्यकारी अभियंता यांच्याशी दूरध्वनीवरून संवाद साधत गतिरोधकाचे काम तातडीने पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.

आमदारांच्या आश्वासनानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.उपस्थित मान्यवर

या ठिकाणी महसूल मंडळ अधिकारी महादेव जायभाये, तलाठी गणपत पोतदार, ग्रामविकास अधिकारी श्रीराम वीर, सहाय्यक पोलीस फौजदार बाबासाहेब राख, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, ग्रामस्थ तसेच डॉ. गणेश ढवळे, पत्रकार हरिओम क्षीरसागर, भालचंद्र विद्यालयाचे मुख्याध्यापक किसन सावंत, पर्यवेक्षक हावळे व शिक्षकवृंद आदी मान्यवर उपस्थित होते.

# स्वच्छतेमुळे जीवन आनंदी व प्रसन्न राहते-प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे




किल्ले धारूर - १९ सप्टेंबर

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक १७ ते २ ऑक्टोंबर २०२५ दरम्यान सेवा पंधरवडा साजरा होत आहे. या निमित्ताने महाविद्यालय परिसरामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी परिसर स्वच्छता केली. स्वयंसेवकांनी परिसर स्वच्छतेबरोबरच झाडांना आळे करणे, कचऱ्याचे संकलन करणे तसेच झाडांच्या संवर्धनासाठी कामे केली. प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी स्वयंसेवकांना स्वच्छतेचे महत्व सांगताना मानवी जीवनाला आनंदी व प्रसन्नमय ठेवण्यासाठी स्वच्छता महत्त्वाची असते असे सांगितले. परिसरा बरोबरच आपल्या जीवनामध्येही खूप महत्त्वाचे असल्याचे सांगितले. व सर्व स्वयंसेवकांना स्वच्छते विषयीचा संदेश दिला. रासेयो स्वयंसेवकांना कार्यक्रमाधिकारी डॉ. डी. डी. जाधव, डॉ. विजयकुमार कुंभारे, प्रा. बालासाहेब जोगदंड, यांनी मार्गदर्शन केले. परिसर स्वच्छतेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर, कार्यालय अधीक्षक श्री. सुभाष वायाळ यांनी स्वयंसेवकांचे अभिनंदन केले.

# केज शहरातील राजर्षी शाहु विद्यामंदिर येथे मराठवाडा मुक्ती संग्राम दिन उत्साहात साजरा



केज/प्रतिनिधी

केज शहरातील स्वामी दयानंद प्रतिष्ठान केज संचलित,राजर्षी शाहू विद्या मंदिर शाळेत मराठवाडा मुक्ती संग्राम दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला प्रथम स्वामी रामानंद तिर्थ यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला व मराठवाडा मुक्ती संग्रामातील ज्ञात अज्ञात वीरांना अभिवादन करण्यात आले. ध्वजारोहणाचा मान माजी सैनिक श्री.व्यंकटराव ज्ञानोबा देशमुख वरपगावकर यांना देण्यात आला. याप्रसंगी शाळेच्यावतीने त्यांचा आदर सत्कार करण्यात आला. ध्वजारोहणासाठी संस्थेचे सचिव श्री.गदळे जी.बी,सामाजिक कार्यकर्ते श्री.हनुमंत भोसले,शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती चाटे बी.बी.शाळेतील सेवानिवृत्त शिक्षक श्री.डापकर एस.ए व श्री.चौधरी बी.डी तसेच शाळेतील सर्व शिक्षक वृंद,विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# अतिवृष्टी अनुदान घोटाळ्यातील आणखी एक आरोपी अमरावतीतून जेरबंद

## आर्थिक गुन्हे शाखा जालना पोलिसांची मोठी कारवाई

जालना /प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील अतिवृष्टी अनुदान घोटाळ्याचा तपास वेगाने पुढे जात असून,या प्रकरणातील फरार आरोपी शिवाजी श्रीधर ढालके वय-३४, व्यवसाय नोकरी तलाठी, तहसील कार्यालय अंबड,रा. उमरी बाजार ता.दर्यापूर जि. अमरावती याला आर्थिक गुन्हे शाखा जालना पोलिसांनी अमरावती शहरातून अटक केली आहे. सदर प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशान्वये चौकशी समिती गठीत करण्यात आली होती.चौकशीत आरोपींनी स्वतःचे नातेवाईक मित्र परिचित यांच्या नावाने बनावट अर्ज करून जिरायत जमीन बागायत दाखवणे क्षेत्रवाढ दाखवणे शासकीय गायरान जमीन स्वतःच्या नावावर दाखवणे अशा विविध गैरप्रकारांतून शासनाकडून मिळणारे २४,९०,७७,८११/- इतके अनुदान अपहार करून आपसात वाटून घेतल्याचे निष्पन्न झाले.

या गंभीर घोटाळ्याप्रकरणी पोलीस ठाणे अंबड येथे गुन्हा रजिस्टर नंबर ४५३/२०२५ विविध कलमान्वये दाखल करण्यात आला आहे.

या गुन्ह्यातील पहिला अटक आरोपी सुशिलकुमार दिनकर जाधव याला यापूर्वीच अटक करण्यात आली होती. त्याला ७ दिवसांची पोलीस कोठडी संपल्यानंतर न्यायालयीन कोठडी सुनावली असून सध्या तो जालना कारागृहात आहे.

सदर प्रकरणातील फरार आरोपींना पकडण्यासाठी पोलीस अधीक्षक मा. अजयकुमार बन्सल यांनी विशेष आदेश दिले होते. त्यानुसार आर्थिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे शिवाजी ढालके अमरावतीत लपल्याचा ठावठिकाणा शोधून काढला. त्यानंतर पथकाने अमरावती शहरात धाड टाकून त्याला अटक करण्यात यश मिळवले.

अटक केलेल्या आरोपीकडे अनुदान घोटाळ्याशी संबंधित अनेक बाबींचा सखोल तपास सुरू असून, इतर फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मा. अजयकुमार बन्सल व अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

यामध्ये श्री. सिद्धार्थ माने (प्रभारी पोलीस उपअधीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा, जालना), श्री. मिथुन घुगे स.पोलीस निरीक्षक, आर्थिक गुन्हे शाखा,जालना यांच्यासह पोलीस अंमलदार गोकुळसिंग कायटे,समाधान तेलंग्रे, किरण चव्हाण,अंबादास साबळे, गजानन भोसले,सागर बावीस्कर,दत्ता वाघुंडे,विष्णु कोरडे,ज्ञानेश्वर खुने,रविंद्र गायकवाड,शुभम तळेकर, श्रेयस वाघमारे,चालक पाठक मेजर, महिला अंमलदार जयश्री निकम, निमा घनघाव,मंदा नाटकर यांनी विशेष परिश्रम घेतले.

# एसपी’नी घडविले माणुसकी अन् सहृदयतेचे दर्शन

## पोलीस कुटुंबीयांच्या बाळांसाठी पोलिस अधीक्षक जिल्हा रुग्णालयात दाखल

बीड (प्रतिनिधी):

जिल्हा पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी दैंनदिन व्यस्त कामातून वेळ काढून अंगरक्षक असलेल्या राऊत यांच्या पत्नीची मुदतपूर्व प्रसुती झाली. बाळांना अतिदक्षता एनआयसीयु दाखल करण्यात आले.

पोलिस अधीक्षक नवनीत काँवत यांचा शुक्रवार दिनांक १९ सप्टेंबर रोजी वाढदिवस होता. अधिकारी, कर्मचारी आणि अन्य मान्यवरांनी शुभेच्छा देण्यासाठी पोलिस अधीक्षक कार्यालयात आले होते. एस पी नवनाथ कवा त्यांना आपले अंगरक्षक पोलीस राऊत कुटुंबीयांची मदतपूर्व प्रसूती झाल्याचे समजले. त्यांनी पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या




समवेत बाकी कामे बाजूला जिल्हा रुग्णालयात धाव घेतली. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय राऊत, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक शहाणे, समन्वयक डॉ. हनुमंत पारखे व तज्ञ डॉक्टरांची भेट घेतली. अंगरक्षक पोलिस कर्मचारी राऊत यांच्या बाळ आणि बाळाच्या आईच्या आरोग्याची आस्थेवाईकपणे विचारपूस केली.

जिल्हा पोलिस अधीक्षक म्हणून मोठा व्याप आणि व्यस्त दिनचर्या असताना नवनीत कॉवत यांनी या भेटीतून आपल्यातील माणुसकी व सहृदयतेचे दर्शन घडवले.बीड येथे रुजू झाल्यापासून कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न सुरू आहेत. शिस्तप्रिय, कार्यतत्पर, सजग आणि मृदू प्रसंगी कठोर आणि ’सदरक्षणाय खलनिग्रहणाय’ या ब्रीद वाक्याशी निष्ठा असलेला अधिकारी अशी त्यांची प्रतिमा निर्माण होत आहे.कायदा, सुव्यवस्था, शांतता राखण्यासाठीची उपाययोजना, आदी विविध कामाबरोबरच पोलिस, कर्मचारी- अधिकारी यांच्यासाठी स्वतः पोलिस अधीक्षक कुटुंब प्रमुख म्हणून बारकाईने आणि गांभीर्यपूर्वक पाहत असल्याचे यावरून दिसून आले आहे.

# धर्माबादेत जेलभरो आंदोलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद

(अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरणाच्या मागणीसाठी लोकस्वराज्य आंदोलन आक्रमक)

धर्माबाद, ( अशोक पडोळे ) लोकस्वराज्य आंदोलन या सामाजिक संघटनेकडून अनुसूचित जाती आरक्षण उपवर्गीकरण यासह विविध मागण्यांसाठी संस्थापक अध्यक्ष प्रा. रामचंद्र भरांडे यांच्या नेतृत्वाखाली शुक्रवारी रोजी राज्यभर जेलभरो आंदोलनाची हाक दिली होती. त्या अनुषंगाने धर्माबादेतही लोकस्वराज्य आंदोलनाचे प्रदेश उपाध्यक्ष व्ही. जी. डोईवाड यांच्या मार्गदर्शनाखाली समाज बांधव आक्रमक होऊन शुक्रवारी जेलभरो आंदोलन केले. या आंदोलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

मागील तीन ते साडेतीन दशकापासून लोकस्वराज्य आंदोलन महाराष्ट्र या सामाजिक संघटनेकडून तत्कालीन राज्य सरकारकडे वेळोवेळी आंदोलने, महामोर्चा, महापदयात्रा, मेळावे, आरक्षण परिषदा घेत अनुसूचित जाती आरक्षणाचे ’अबकड’ असे वर्गीकरण




करण्यात यावे. ही मागणी केली आहे. विद्यमान सरकारने अनुसूचित जाती आरक्षणाचे तात्काळ उपवर्गीकरण करण्यात यावे, क्रांतिवीर लहुजी साळवे अभ्यास आयोगाच्या ६८ शिफारशींची तात्काळ अमलबजावणी करण्यात यावी, न्यायमूर्ती बदर समितीचा कालावधी सहा महिन्याहून एक महिन्याचा करण्यात यावा. यासाठी शुक्रवारी तहसील कार्यालय धर्माबाद येथून पोलीस स्टेशन पर्यंत लोकस्वराज्य आंदोलन यांच्या वतीने जेलभरो आंदोलन करण्यात आले. यावेळी राज्य शासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करीत रॅलीद्वारे हलगी मोर्चा काढून जेलभरो आंदोलन केले. या आंदोलनात लोकस्वराज्य आंदोलनाचे प्रदेश उपाध्यक्ष व्ही. जी. डोईवाड, बि. एम. गोणारकर, एम. जे. पिंगळे, नागोराव कमलाकर, लक्ष्मण निदानकर, नामदेव सोनकांबळे, जी. आर. गोणारकर, नारायण इबितवार, पत्रकार सुरेश घाळे, सत्यनारायण पवळे, संजय गायकवाड, श्याम पिंगळे, अविनाश पिंगळे, गंगाधर, माधव, बंडू मास्तर, संतोष वासनिकर, मारोती तेडलवार, संजय चिमणेकर, वंदना भोईवार, महानंदा चिमणेकर



# शेतक-याचा सोलर सेट उद्धस्थ केला पावसाने !

मानूर /प्रतिनिधी ह्व

शिरूर कासार तालुक्यातील मानूर येथील शेतकरी अनिल भानुदास कदम यांचा शेतातील गट नंबर ५८ मधील विहीरीवर बसवलेला तीन एच पी चा सोलर सेट रविवारी झालेल्या पावसाने उद्धस्त केला असुन शेतक-याचे मोठे नुकसान झाले आहे .

कदम यांनी विजेच्या लंपडवाडातून मुक्तता मिळावी यासाठी तीन एच पीचा सहा प्लेटा असलेला सौरसेट उभारला होता ,त्याचा चांगला फायदा होत होता मात्र रविवारी झालेल्या धुव्वाधार पावसाने मोठ्या प्रमाणात पाणी आले आणि त्या पाण्याचा प्रवाह जोराचा असल्याने विहिरीच्या खरिपाबरोबर सोलर सेट वाहून गेला असल्याने मोठे नुकसान झाले त्याचबरोबर अनिल कदम यांची काढणीला आलेले तुरीचे पिक देखील पाण्यात गेले असल्याने नुकसान झाले . दोन्हीचे नुकसान पंचनामे प्रशासनाने करून भरपाई देण्याची मागणी कदम यांनी केली आहे .

# सेवा पंधरवाड्यात सर्वांनी सहभाग घ्या आ.जितेश अंतापूरकर

देगलूरमध्ये भव्य रक्तदान शिबिर यशस्वी

देशाचे युगपुरुष व खंबीर नेतृत्व करणारे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदीजी यांच्या वाढदिवसानिमित्त १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत संपूर्ण देशभर सेवा पंधरवाडा साजरा केला जात आहे. या सामाजिक उपक्रमाचा भाग म्हणून देगलूर येथे एक भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते, ज्याने समाजात सेवाभावाची नवी ऊर्जा निर्माण केली.

या शिबिराचे उद्घाटन देगलूर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार मा. जितेशभाऊ अंतापुरकर यांच्या हस्ते भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. त्यांच्या प्रभावी नेतृत्वात व प्रेरणादायी मार्गदर्शनाखाली हा उपक्रम अत्यंत यशस्वीरीत्या पार पडला.

कार्यक्रमास माजी सभापती



शिवाजीराव देशमुख बळेगावकर, राजेश महाराज देगलूरकर, अशोक गंदपवार उपजिल्हाधिकारी अनुप पाटील, उपविभागीय पोलिस अधिकारी श्री गोसावी, तहसीलदार भरत सूर्यवंशी, पोलिस निरीक्षक मारोती मुंडे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली.

भाजपचे शहराध्यक्ष प्रशांत लच्छिराम दासरवार, सरचिटणीस दीपक संगमकर, भीमराव जोगावार, जनार्दन बिरादार, सुरेशभाऊ मिसाळे, दिगंबर कडलवार, बालाजी मैलागीरे, माधव पाटील पाळेकर, इत्यादी असंख्य कार्यकर्त्यांनी रक्तदान उपक्रमात भाग घेऊन आपली समाजभानाची बांधिलकी सिद्ध केली.


महिलांचीही उपस्थिती लक्षणीय होती. सौ. मधुमती घोंगडे, सौ. सुनीता कमटलवार, सौ. इंदिरा पटलावार, सौ. प्रीति चालिकवार, कु. भावना दाशेटवार, फातिमा फिरदौस यांसारख्या महिलांनी आपला सक्रिय सहभाग नोंदवून इतरांसाठी प्रेरणास्थान निर्माण केले.

या वेळी उपस्थित कार्यकर्त्यांना संबोधित करताना आ. जितेश अंतापूरकर यांनी सांगितले की, सेवा पंधरवाडा हा केवळ एक उपक्रम नाही, तर समाजसेवेचे व्रत आहे. प्रत्येकाने या उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा. रक्तदानासारख्या कार्यातून आपण समाजाशी आपली नाळ जोडली पाहिजे. त्यांनी रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवर, कार्यकर्ते आणि उपस्थितांचे मनःपूर्वक आभार मानले. जनतेची सेवा हाच आमचा धर्म या विचारधारेतून भाजपा कार्यकर्त्यांनी राबवलेला हा सामाजिक उपक्रम नक्कीच इतरांसाठी प्रेरणादायी ठरला आहे.

# गावाकडच्या भूमिपुत्रांच्या कौतुक वर्षावाने पोलीस अधिकारी गहिवरतात तेव्हा...

मुंबई (प्रतिनिधी)

पोलीस विभागामध्ये कार्यरत असताना राष्ट्रीय पातळीवर प्रतिनियुक्तीवर असताना अत्यंत मौलिक कामगिरी केल्याबद्दल २०२४ मध्ये भारत सरकारचे केंद्रिय गृहमंत्री दक्षता पदक व २०२५ मध्ये राष्ट्रीय तपास यंत्रणा पोलीस महासंचालकांच्या रौप्यपदक प्रदान करून अनेक प्रशस्ती पत्रास पात्र ठरलेल्या आपल्या मित्राच्या अभिनंदनसाठी गेलेल्या आष्टी येथील पत्रकार बांधवांनाच्या शुभेच्छा वर्षावाने उच्चपदस्थ पोलीस अधिकारी अक्षरशः गहिवरून गेले! त्याचे झाले असे की,मुंबई येथे पोलीस उपायुक्तपदी नियुक्तीवर असलेले आष्टी तालुक्यातील रुईनालकोलचे भूमिपुत्र बजरंग आनंदराव बनसोडे यांना नुकताच राष्ट्रीय तपास यंत्रणा महासंचालक यांच्याकडून विशेष कामगिरी बद्दल रौप्य पदक जाहीर करण्यात आले आहे.ही बाब अष्टीकरांना विशेष अभिमानास्पद आणि आनंदाची झाली... आणि म्हणून आष्टी येथील त्यांचा वर्गमित्र रघुनाथ कर्डीले हे ११ पत्रकारांसह पोलीस उपायुक्त बजरंग बनसोडे यांच्या मुंबईतील कार्यालयात जाऊन उत्स्फूर्तपणे त्यांचे कौतुक,अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.गावाकडच्या बालपणीच्या मित्र परिवारा कडून झालेले हे कौतुक अनुभवताना पोलीस विभागातील उच्च पदावर असलेल्या पोलीस उपायुक्त बजरंग बनसोडे यांना भावना अनावर झाल्या. अक्षरशः गहिवरून व आनंदुन त्यांनी या अत्यंत प्रेमाच्या शुभेच्छा स्वीकारल्या.... आणि एक तास गप्पांमध्ये मैफिल रंगली...राष्ट्रीय तपास यंत्रणा नवी दिल्ली येथे कार्यरत असताना राष्ट्रीय सुरक्षा व ऐक्य अबाधित राखण्यासाठी केलेल्या विशेष



कामगिरीबद्दल भारत सरकार गृह विभागाने केंद्रीय गृहमंत्री दक्षता पथक २०२४ हा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला आहे.देशसेवा देशहिताला सर्वप्रथम प्राधान्य देणारी बजरंग बनसोडे यांची वृत्ती आहे.त्यांना कठीण काम सहज पूर्ण करण्यास मदत करते.याप्रसंगी तालुक्यातील महापूर,पिकांची हानी,नागरिकांचे हाल,पर्यावरण संरक्षण,पर्यावरण संरक्षण,नदी संरक्षण,संवर्धन या विषयावर त्यांनी उपयुक्त चर्चा केली.पर्यावरणाची जोपासना व पंचमहाभूतांचे महत्त्व ओळखून त्यांना जपणे आणि संवर्धन करणे हे मानवी कल्याणासाठी खूप आवश्यक आहे असेही यावेळी बनसोडे यांनी सांगितले.विद्यार्थीदशेत बन्सोडे यांनी नवी मुंबई (पनवेल) येथे बस स्टॅन्डजवळ एका उसाच्या रसवंतीच्या दुकानावर कामगार (वेटर) म्हणून काम केले होते. त्याचवर्षी त्यांचा इयत्ता बारावीचा निकाल लागला आणि पुढील प्रगतीची वाटचाल सुरू झाली असेही त्यांनी यावेळी आवर्जून पत्रकारांशी बोलताना सांगितले. ग्रामीण भागातील मुलांना प्रामाणिक व कठोर परिश्रम आणि शिक्षण हाच एकमेव प्रगतीचा विकासाचा मार्ग आहे.विशेषता मराठवाड्यातील दुष्काळी भागात पर्यावरण व शिक्षण यावर भिस्त ठेवूनच प्रगती करणे शक्य असल्याचेही बन्सोडे यांनी सांगितले.

आष्टीचे भुमीपुत्र मुंबई पोलिस उपायुक्त बजरंग बनसोडे यांची मुंबई उझ कार्यालयात आष्टी तालुका पत्रकार संघाने भेट घेऊन शुभेच्छा दिल्या.पत्रकार रघुनाथ कर्डिले यांचे वर्गमित्र असल्याने सदिच्छा भेट घेऊन गावाकडच्या विविध विषयावर चर्चा करण्यात आली.यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण पोकळे,उपाध्यक्ष संतोष सानप, झुंजारनेताचे उपसंपादक उत्तम बोडखे,रघुनाथ कर्डिले,भीमराव गुरव,शरद तळेकर,सचिन रानडे,मनोज पोकळे,शरद रेडेकर, गणेश दळवी उपस्थित होते.

# तरुण पिढीत एचआयव्ही/एड्स विषयक सजगता गरजेची– प्राजक्ता जोशी

फारुक शेख :-आजच्या तरुण पिढीला योग्य दिशा देणे आणि त्यांना जीवनातील संकटांपासून वाचवणे ही काळाची गरज आहे. समाजात वाढत्या आजारांपैकी एचआयव्ही/एड्स हा अतिशय गंभीर आजार असून त्याविषयी तरुणांमध्ये सजगता निर्माण होणे अत्यावश्यक आहे.असे प्रतिपादन जिल्हा सामान्य रुग्णालय जालना येथील आरोग्य समुपदेशिका सौ.प्राजक्ता जोशी यांनी केले.अंकुशराव टोपे जयंती सप्ताहानिमित्त आरोग्य जनजागृती अंकुशराव टोपे महाविद्यालय, जालना येथे सुरू असलेल्या कर्मयोगी अंकुशराव टोपे यांच्या जयंती सप्ताहाच्या दुसऱ्या दिवशी राष्ट्रीय सेवा योजना (रा.से.यो.) विभागाच्या वतीने आरोग्य विषयक




जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस होते.यावेळी मार्गदर्शन करताना प्राजक्ता जोशी म्हणाल्या समाजातील अनेक वाईट प्रवृत्ती व चुकीच्या जीवनशैलीमुळे एचआयव्ही/एड्ससारख्या आजारांचा धोका वाढताना दिसतो. या आजारापासून वाचण्यासाठी जागरूकता, योग्य माहिती आणि काळजी घेणे आवश्यक आहे. संस्कारक्षम व सजग पिढी तयार झाली तरच समाजात सकारात्मक बदल घडवता येईल.या कार्यक्रमात जिल्हा सामान्य रुग्णालयातील श्री. आराख यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. संजय पाटील यांनी केले. प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस यांनी अध्यक्षीय समारोप करून विद्यार्थ्यांना आरोग्यसजगतेचे महत्त्व पटवून दिले.या प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी रा.से.यो. विभागाचे कार्यक्रम अधिकारी प्रा. अविनाश भालेराव, डॉ. मसूद अन्सारी, डॉ. भुजंग डावकर यांनी विशेष प्रयत्न केले.सूत्रसंचालन डॉ. बद्रीनाथ शिंदे यांनी केले तर आभार प्रा.मनोरमा पात्रे यांनी मानले.

# पाटोद्याच्या जयभवानीत यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे बी.ए.चे प्रवेश सुरू

३० सप्टेबंर पर्यंतच घेता येणार प्रवेश

पाटोद (प्रतिनिधी)

दिनांक:८ जुलै : पाटोदा येथिल जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालय,पाटोदा येथे.यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,नाशिक चे केंद्र क्रंमाक २२१६४ या केंद्रामध्ये नौकरी करत असलेल्या विद्यार्थ्यांना बहिस्थ उच्च शिक्षणाची सुविधा उपलब्ध झाली आहे.बी.ए.प्रथम,द्वितीय,तृतीय वर्ष ,या वर्गाचे प्रवेश सुरू झाले आहेत.तरी पाटोदा तालुक्यातील ज्या विद्यार्थ्यांना बहिस्थ म्हणुन बी.ए. वर्गाला प्रवेश घेवयाचे असतील त्यांनी ३० सप्टेबर पर्यंत महाविद्यालयाच्या अभ्यास केंद्राशी संपर्क साधून आपला प्रवेश निश्चित करावा.प्रवेशाच्या अधिक माहिती साठी केंद्र संयोजक प्रा.डॉ. वंदन जाधव,संपर्क मो.(९४२१३३९३५५) साह्यक केंद्र संयोजक प्रा. डॉ.अशोक देवगुडे संपर्क मो.न.( ८६६८२७१५१९ ) व तंत्र स्नेही श्री.दिपक जावळे संपर्क मो.नं.(९०९६७१४४१३)श्री. रमेश गिरे संपर्क मो.न.( ८२७५००३७३३ ) यांच्याशी संपर्क साधावा असे मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम,अभ्यास केंद्राचे केंद्र प्रमुख प्र.प्राचार्य प्रा.सोमनाथ घाडगे,केंद्र

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
Yashwantrao Chavan Maharashtra Open University
ज्ञानगंगा घरोघरी

संयोजक प्रा.डॉ.वंदन जाधव,सहकेंद्र संयोजक प्रा. डॉ.अशोक देवगुडे यांनी कळविले आहे.

# बीड शहरातील कमवडा गल्लीत तीन घरे कोसळली

## एक घर जमीन दोस्त,दोन महिला जखमी,संसार उपयोगी वस्तू उध्वस्त



बीड / प्रतिनिधी

जिल्ह्यासह राज्यभरात होत असलेल्या अतिवृष्टीचे दुष्परिणाम समोर येत आहे बुधवारी रात्री झालेल्या संतधार पावसामुळे शहरातील कागदी वेस भागातील कमवाडा गल्लीतील नागरिकांची तीन घरे कोसळली असून यातील एक घर पूर्णतः जमीन दोस्त झाला आहे. यात दोन महिला गंभीर जखमी झाले असून संसार उपयोगी वस्तू उज्वस्तू होऊन मोठ्या प्रमाणावर आर्थिक आणि झाली आहे.

असे की,बुधवारी रात्री झालेल्या मुसळधार पावसाचे पाणी जमिनीत मुरल्याने बीड शहरातील कागदी वेस भागातील कमवाड गल्ली येथील तारेख मिर्झा बेग,शहजाद मिर्झा बेग आणि शेख हलीमा बेगम या तीन नागरिकांची घरे कोसळली आहे.दिवसा बारा वाजता ही घटना घडली असून या घटनेत एक घर पूर्णतः जमीन दोस्त झाली आहे.या घटनेत दोन महिला गंभीर जखमी झाली असून जमीन दोस्त झालेल्या घरातील संसार उपयोगी वस्तू पूर्णतः उध्वस्त होऊन मोठ्या प्रमाणात आर्थिक हानी झाली आहे.

याबद्दल मिळालेली अधिक माहितीनुसार घटनास्थळी अग्निशमन दल,नगरपरिषद चे अधिकारी,तहसीलचे कर्मचारी व पोलीस कर्मचारी तातडीने दाखल झाले असून घटनास्थळी एम.आय.एम ड.शेख शफिक भाऊ,नगरसेवक जैतुल्ला खान,समजसेवक पठाण मुसाखान सह परिसरातील युवकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मदत आणि बचाव कार्यात प्रशासनाला सहकार्य केले आहे.

# संविधानाला धोका मशिनमुळे नव्हे, अमानवीय निर्णयांमुळे!

प्रतिनिधी । मुंबई

संविधानाला खरा धोका मशिनमुळे नव्हे, तर अमानवीय चुकांमुळे असल्याचे प्रतिपादन 'एआय' मंत्री डिएलाने संसदेतील भाषणावेळी केले.

आपल्या पहिल्या भाषणात डिएलाने स्पष्ट केले की, विरोधक तिच्या नियुक्तीला सतत असंवैधानिक ठरवत आहेत आणि त्यांच्यावर आक्षेप घेत आहेत. मात्र, ती फक्त मनुष्याच्या मदतीसाठी आहे, मनुष्याची जागा घेण्यासाठी नाही. संविधानाला धोका मशीनमुळे नसून सत्तेत बसलेल्या लोकांच्या अमानवीय निर्णयांमुळे आहे, असे डिएलाने म्हटले.डिएलाने आश्वासन दिले की पारदर्शकता, जबाबदारी आणि निष्पक्षता या मूल्यांचे पालन ती तितक्याच काटेकोरपणे करेल जितके मनुष्य करतात.

'डिएला' या नावाचा अल्बानियन भाषेत अर्थ 'सूर्य' असा आहे. त्या नावानेच या नवीन एआय महिला मंत्र्याला ओळखले जात आहे. डिएलाचा चेहरा आणि आवाज हा अल्बेनियाची सुप्रसिद्ध अभिनेत्री अनिला बिशा हिच्यावर आधारित आहे.



आपल्या पहिल्याच संसदीय कामाच्या दिवशी आणि पहिल्याच भाषणाच्या दिवशी डिएला ही पारंपरिक अल्बेनियन पोशाखात दिसली. अल्बानियाचे पंतप्रधान एडी रामा यांनी १२ सप्टेंबर रोजी डिएलाची नियुक्ती सार्वजनिक खरेदी मंत्रालयात एआय मंत्री म्हणून केली. अल्बेनिया युरोपियन युनियनमध्ये सामील होण्याच्या प्रक्रियेत आहे, मात्र त्या देशात सुरू असलेला भ्रष्टाचार ही सर्वात मोठी अडचण ठरत आहे. सरकारी टेंडर प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी आणि भ्रष्टाचाराला पूर्णविराम देण्यासाठी हा नवा प्रयोग करण्यात आला आहे. पंतप्रधानांनी सांगितले की, सार्वजनिक निधीच्या वापरात १०० टक्के पारदर्शकता आणि भ्रष्टाचारमुक्त प्रक्रिया राबविण्याची जबाबदारी डिएलाकडे आहे.

# माजलगाव धरणाचे ११ दरवाजे उघडले; सांडस चिंचोली गाव रेड अलर्टवर

प्रतिनिधी । माजलगांव

माजलगाव तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पावसाचा जोर कायम आहे. सातत्याने होत असलेल्या या पावसामुळे माजलगाव धरणाची पाणी पातळी झपाट्याने वाढली असून, धरण सुरक्षिततेसाठी प्रशासनाने तब्बल ११ दरवाजे उघडून पाण्याचा विसर्ग सुरू केला आहे.या निर्णयामुळे सिंदफना नदीत मोठ्या प्रमाणावर पाणी सोडले जात असून, नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

सांडस चिंचोली गावाचा संपर्क तुटला

धरणातून वाढीव पाणी सोडल्यामुळे सांडस चिंचोली गावाचा बाहेरील संपर्क पूर्णपणे तुटला आहे. गावकऱ्यांना आवश्यक ते सर्व मदतकार्य प्रशासनामार्फत पोहोचवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. सध्या या भागात रेड अलर्ट घोषित करण्यात आला असून, नदी व ओढ्याच्या काठावर राहणाऱ्या

## नागरिकांना सतर्कतेचे आवाहन – तलाठी मा. चंदेल; फोटोशूटच्या नादात जीवाशी खेळू नका – नितीन काळे



नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्याचे निर्देश दिले जात आहेत.

महसूल प्रशासन सतर्क – तलाठी चंदेल गावकऱ्यांसोबत

या गंभीर परिस्थितीत महसूल विभागाचे कर्तव्यदक्ष अधिकारी तलाठी मा. चंदेल हे स्वतः पावसात भिजून गावकऱ्यांसोबत उभे राहून त्यांना मार्गदर्शन करत आहेत. सुरक्षा हीच प्राथमिकता आहे. नागरिकांनी घाबरून न जाता प्रशासनाला सहकार्य करावे. धरण परिसरात किंवा नदीकाठावर अजिबात जाऊ नये, असे आवाहन त्यांनी केले आहे.

**मोबाईल, सेल्फीचा नाद धोकादायक**

धरण परिसर व पाण्याच्या प्रवाहाजवळ अनेक तरुण मोबाईलवर व्हिडीओ, फोटो व सेल्फी घेण्यासाठी गर्दी करत असल्याचे दिसून येत आहे. यावर नाराजी व्यक्त करत समाजसेवक नितीन काळे यांनी स्पष्ट इशारा दिला आहे – फोटोशूटच्या नादात जीवाशी खेळू नका. पाणी कोणत्याही क्षणी अनियंत्रित होऊ शकते. प्रशासनाच्या सूचना पाळा.

# पैठण तालुक्यात पालकमंत्री संजय शिरसाठ यांची अतिवृष्टीग्रस्त भागात पाहणी

## तात्काळ पंचनामे करण्याचे दिले आदेश

प्रतिनिधी । पैठण

पैठण: छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाठ यांनी पैठण तालुक्यातील ढोरकिन, मुधलवाडी, राहुल नगर, कातपूर या भागांची पाहणी केली. गेल्या काही दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून शेतात पावसाचे पाणी शिरल्याने गंभीर अडचणी निर्माणझाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री शिरसाठ पैठणचे आमदार विलास भुमरे यांनी थेट शेतकऱ्यांच्या समस्या ऐकून घेतल्या. प्रशासनातील अधिकाऱ्यांना तात्काळ पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले. तसेच राज्य शासन आणि केंद्र शासनाकडून शक्य ती मदत



तातडीने शेतकऱ्यांना मिळावी यासाठी आवश्यक ती पावले उचलली जातील, असे आश्वासन शिरसाट यांनी दिले. शेतकरी बांधवांवर ओढवलेल्या या संकटाच्या काळात आम्ही ठामपणे त्यांच्या पाठीशी आहोत असे पालकमंत्री शिरसाठ यांनी स्पष्ट केले.यावेळी भाऊ लबडे, काकासाहेब बर्वे, सरपंच धनंजय मोरे, उपसरपंच विजय खडसन, आशिष जाधव, गणेश जानकर, शाम शेलार,संजय आढाव एकनाथ मोरे,आदी शेतकरी कार्यकर्ते उपस्थित होते